cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१४० | मंगळवार दि.१० सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# पंधरा दिवसात पीक विमा द्या !

## कृषी मंत्री धनंजय मुंडेंच्या पिक विमा कंपनीस कडक सुचना; बीड जिल्ह्यातील नुकसानीचा घेतला आढावा

**बीड । प्रतिनिधी**

मागील काही दिवसात झालेल्या सततच्या पावसाच्या पाण्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून तातडीने त्याचे सॅम्पल सर्व्हे विमा कंपनी व कृषी विभागाने संयुक्तरित्या ८ दिवसात पूर्ण करुन त्यापुढील १५ दिवसात शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा, असे निर्देश कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीस आ.बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, रा कॉं चे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, ◀◀ पान २ वर




### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणीचा घेतला आढावा


मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यां योजनेचा आढावा पालक मंत्री श्री मुंडे यांनी घेतला असून जिल्हयातील एकूण ६ लाख ४१ हजार १४७ महिलांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. यापैकी ६ लाख १६ हजार ७८८ महिलांचे अर्ज मंजुर झालेले असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी श्री. मुंडे यांना दिली. १२ हजार ६११ अर्जांवर मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू असून ११ हजार ७४८ अर्ज विविध कारणांनी प्रलंबित असल्याचे जिल्हाधिकारी यांनी पालक मंत्री यांना सांगितले, उर्वरीत अर्जांवरील समस्या लवकर दूर करून त्यांनाही मंजुरी देण्याचे निर्देश पालक मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी केल्या.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदानाला मान्यता

### ३० कोटींचे होणार वितरण, शासन निर्णय निघाला

**मुंबई । प्रतिनिधी**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत ३० कोटी अनुदान वितरित करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. २०२४–२५ वर्षातील मंजूर प्रस्ताव निकाली काढण्यासाठी चालू आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतुदीतून सदर अनुदान देण्यात येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय सोमवारी (दि.९) प्रसिद्ध केला आहे.



गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत मृत्यू पावलेल्या अथवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना मदत अनुदान देण्यात येते. राज्यात २०१५–१६ पर्यंत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबवली गेली. परंतु या योजनेत अनेक त्रुटी होत्या. विमा कंपन्याकडून दावे निकाली काढण्यात दिरंगाई केली जात होती. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळत नव्हती. त्यामुळे राज्य सरकारने २०२३ पासून सानुग्रह अनुदान तत्वावर योजना ◀◀ पान २ वर

# मार खा, केस झाली तरी होऊ द्या, पण मागे हटू नका

## मनोज जरांगे यांची बीडच्या सभेतून सिंहगर्जना; फडणवीसांना थेट इशारा




**बीड । प्रतिनिधी**

बीड– गोरगरीब मराठ्यांनी जागे व्हावे. मार खायची वेळ आली तर खा, केस झाली तर होऊद्या. पण मागे हटू नका, असे आवाहन करीत मनोज जरांगे हे बीड येथील घोंगडी बैठकीच्या सभेत चांगलेच आक्रमक झालेले दिसून आले. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट इशारा देत मराठे आता तुम्हाला लोळविल्याशिवाय राहणार नसल्याचे सांगितले.

यावेळी पुढे बोलताना जरांगे म्हणाले, आपण २८८ मतदारसंघात घोंगडी बैठक घेणार आहोत. इथे बैठका आहेत, पण सभा होत आहेत. घोंगडी बैठकीला देखील ग्राउंड लागत आहे. आता ही आरपराची लढाई आहे. किती ही आडवे येऊ द्या. आता थांबत नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन आमदार उभे केले. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून त्यांना त्यांची संपत्ती सभाळायची आहे. फडणवीस साहेब, मराठे आता तुम्हाला लोळवल्याशिवाय राहणार नाहीत. तुम्ही जर आरक्षण नाही दिलं तर तुमचे ११३ आमदार घरी गेले म्हणून समजा, असा इशारा मनोज ◀◀ पान २ वर

### पाटलांचा सोशल मिडिया रोहित पवारांकडून मॅनेज– आ. राऊत

सोलापूर : आमदार राऊत यांनी पत्रकार परिषद घेत मनोज जरांगे यांच्या सोशल मिडिया टीमकडून होत असलेल्या टीकेंवर बोलताना आमदार रोहित पवार यांना लक्ष्य केले. मनोज जरांगे यांचा सोशल मिडिया रोहित पवार यांच्याकडून मॅनेज केला जातं असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. तसेच, शरद पवार यांचा बार्शी दौरा झाल्यापासूनच बार्शीत माझ्याविरुद्ध राजकारण होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

### माझ्यावर बोलण्यासाठी बैलांची बदलाबदली

तुम्ही ज्या पक्षात काम करत आहे त्या पक्षाचे नेते आम्हाला का आरक्षण देत नाहीत? असा सवाल आता भाजपमधल्या पुढाऱ्यांना त्यांची लेकरं विचारतील असं जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, तुमच्या लेकरांवरील अन्याय कायम डोळ्यासमोर ठेवा. माझ्या विरोधामध्ये भरपूरजण उभे केले आहेत. आठवड्यालाच आमदार बदलतात. बैल बदलले जात आहेत.

### बीडने राईट पाडापाडी केली

बीडची तऱ्हा न्यारी आहे. बीडने राईट पाडापाडी केली, असे वक्तव्य करुन पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांना पुन्हा डिवचण्याचे काम केले आहे. परळीत मुंडे बहिण–भावावर न बोलल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. मात्र बीडमध्ये त्यांनी पुन्हा लोकसभेचा विषय काढल्याने चर्चेला उधाण आले आहे.

### गावागावात घोंगडी बैठका अन् मराठा सेवकांची टिम

गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा असे सांगत मनोज जरांगे म्हणाले की, हे तीन महिने मराठ्यांचे अस्मितेचे आहेत भविष्याचे आहेत. लढाई माणूस केवळ बेसावध राहिल्यामुळे हरतो. उद्यापासून गावागावात २० पोरांची टीम तयार करा. ज्या गावात अशा टीम तयार होतील त्याच गावात घोंगडी बैठका होतील. गरीब मराठा सगळा बाजूला गेला आहे. श्रीमंत मराठ्याला गरीब मराठा जमत नाही. आचारसंहिता लागण्यापूर्वी आठ दिवस आधी आपण बैठक घेवू आणि मग ठरवू की आपण निवडणूक लढवायची का नाही.

# राज्यातील वीज कर्मचाऱ्यांना बाप्पा पावला

### वेतनात घसघशीत वाढ; इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक वेतन

**मुंबई । प्रतिनिधी**

वीज कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र महावितरण व महापारेषण या कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीची घोषणा केली. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्क्याने वाढ केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय तीन्ही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांना १९ टक्के वेतन वाढ मिळाली आहे. आता महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक वेतनवाढ देण्यात आलेली आहे.

या निर्णयाचा लाभ कर्मचारी, अभियंते, अधिकारी आणि सहाय्यक प्रवर्गातील कामगारांना ◀◀ पान २ वर

### कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या वीज कंपन्यांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ करण्यात आली आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत देवेंद्र फडणवीसांनी याची माहिती दिली.

# सहा हजार मतांनी आमची इज्जत गेली, खोलवर घाव

## जखम अजून भरलेली नाही: धनंजय मुंडे, बीडमध्ये अल्पसंख्यांक मेळावा



**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत ६००० मतांनी आमची इज्जत गेली. ही खूप खोलवर झालेली जखम आहे. ही जखम अद्याप भरलेली नाही, असे वक्तव्य अजितदादा गटाचे नेते व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. ते सोमवारी बीड विधानसभा मतदारसंघात बाबा सिद्दिकी यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या अल्पसंख्याक ◀◀ पान २ वर

### राजेंना उशिरा का होईना शेतकरी समजले

संभाजी राजे यांना उशिरा का होईना शेतकरी समजले आहेत. तुम्ही राजे आहात. संभाजी राजे हे आरोप करतात हे शोभानीय नाहीत. संभाजी राजे यांना सरसकट या शब्दाचा अर्थ कळला तर बरे होईल. मी असा कृषी मंत्री आहे, जो दिवसरात्र शेतकऱ्यांच्या बांधावर आहे, असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले.

### ठाकरेंना गोपीनाथ मुंडेंचा अपमान करणे शोभत नाही

भाजपने गोपीनाथ मुंडे यांच्या काळापासून शिवसेनेच्या जागा पाडण्यासाठी प्रयत्न केले, त्यासाठी खतपाणी घातले, अशी टिप्पणी दैनिक सामनातील अग्रलेखातून करण्यात आली होती. यावरुन धनंजय मुंडे यांनी प्रत्युत्तर देताना म्हटले की, मला बोलायला अतिशय दुर्दैव वाटत आहे. स्वर्गीय बाळासाहेब असते तर त्यांना वाईट वाटले असते. स्वर्गीय मुंडे साहेब नसताना त्यांचे नाव घेऊन बदनाम केले जात आहे. गोपीनाथ मुंडे हे शिलेदार राहिले आहेत. मुंडे साहेब यांची बदनामी करणे हे उद्धव ठाकरे यांना शोभत नाही. संजय राऊत शिवसेना पूर्णपणे पाण्यात घातल्याशिवाय राहणार नाहीत. मुंडे साहेब असताना काहीही बोलले नाहीत. ते नसताना त्यांच्याबद्दल बोलताना संजय राऊतांना लाज वाटली पाहिजे, असा घणाघात धनंजय मुंडे यांनी केला.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ सप्टेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७९.०० क्विंटल | २,५४५ | ३,००० | २,७४५ |
| ज्वारी/हायब्रिड :३०९.५० क्विंटल | २,१०० | २,७४० | २,३०२ |
| मूग :१७०.०० क्विंटल | ५,५०१ | ७,९५१ | ७,३१२ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : २०५.०० क्विंटल | ५,००१ | ७,४५१ | ६,६३८ |
| बाजरी: ५८.०० क्विंटल | २,३०० | ३,८०१ | २,५६६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ७,०११ | ७,०११ | ७,०११ |

# राज्यातील आरटीओ कर्मचारी २४ सप्टेंबरपासून बेमुदत संपावर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने जारी केलेल्या आकृती बंध शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा आणि आकृतीबंधाची पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करावी, या व इतर प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपावर जाण्याचा इशारा देत २४ सप्टेंबर रोजीपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला. मोटार वाहन – आरटीओ विभागासाठी आकृतीबंध मान्यतेचा शासन निर्णय जारी झाला. अत्यंत नगण्य अशा पदोन्नतीच्या संधी असल्याने ◀◀ पान २ वर

# सर्वसाधारण जागेवरही आदिवासी लढवणार

### प्रकाश आंबेडकर यांची घोषणा, वंचित बहुजन आघाडीने बांधली सर्व आदिवासी पक्ष संघटनाची मोट!


**अकोला । प्रतिनिधी**

आरक्षित जागाच आदिवासींनी लढाव्यात असा एक समज निर्माण झाला आहे, तो या विधानसभेच्या निमित्ताने तोडायचा आहे, असा मानस आम्ही केला आहे. काही सर्वसाधारण जागेवर आदिवासी निवडणूक लढवतील, अशी घोषणा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मुंबई येथील पत्रकार परिषदेत केली. राज्यातील सर्व आदिवासी संघटनाना सोबत घेऊन निवडणूक लढणार असल्याचेही यावेळी त्यांनी जाहीर केले.

ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, महाराष्ट्रातला आदिवासी आता एकत्र आला आहे. यापुढील काळात त्यांची एकत्रित वाटचाल होणार आहे. या दृष्टीने महाराष्ट्रात तीन ठिकाणी ◀◀ पान २ वर

# जायकवाडी ९७ टक्के भरले, मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलासा

## ३ हजार क्यूसेकने पाण्याचा विसर्ग, गोदापात्रावरील गावांना खबरदारीच्या सूचना



### मृत साठ्यात गेलेले धरण ९७.३० टक्के भरले

यंदा जायकवाडी धरण मृत साठ्यात गेले होते. पावसाळा सुरु झाल्यानंतर सुरवातीच्या जुन, जुलै या दोन महिन्यात म्हणावा तसा पाऊस झाला नाही. त्यामुळे धरण कोरडेच होते. पण ऑगस्ट महिन्यात नाशिक जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याची आवक थेट जायकवाडी धरणात झाली. यामुळे कोरडे पडलेल्या धरणात पाणी पातळी वाढली आहे. आता धरण ९७.३० टक्के म्हणजे पूर्ण क्षमतेने भरले आहे.

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील हजारो गावांची तहान भागवणारे जायकवाडी धरण ९७.३० टक्के भरले आहे. त्यामुळे आता धरणातून गोदापात्रात सोमवारी (दि.९) दुपारी ३ हजारहून अधिक क्यूसेक पाण्याचा विसर्ग केला जात आहे. त्यामुळे धरणाखालील गावांना खबरदारीच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. दरम्यान, गत वर्षी पाऊस न झाल्याने धरण मृत साठ्यात गेले होते. यामुळे मराठवाड्यातील शेतकरी यंदाही अडचणीत सापडतो की काय अशी शंका येऊ लागली होती. मात्र आता हे धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा शेती पाण्याचा प्रश्न निकाली निघाला ◀◀ पान २ वर

### ६ दरवाजे ०.५ फुटाने उचलले

सोमवारी धरणाचे ६ दरवाजे ०.५ फुटाने उचलण्यात आले असून, गोदावरी नदीपात्रात कोणीही प्रवेश करू नये असे आवाहन धरण प्रशासनाने केले आहे. तसेच कोणतीही जिवीत वा वित्त हानी होऊ नये यासाठी नदीकाठच्या गावातील नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन देखील कार्यकारी अभियंता जाधव यांनी केले आहे.

cmyk

## अग्रलेख

# एकनाथ खडसेंवर एकहाती अन्याय

महाराष्ट्राच्या राजकारणातील त्यातही उत्तर महाराष्ट्रातील राजकारणातील एक प्रभावशाली नेते एकनाथ खडसे यांच्या सध्याच्या राजकीय वाटचालीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. कित्येक वर्षे भारतीय जनता पक्षासोबत असलेल्या आणि या पक्षाला महाराष्ट्रात वाढवण्यासाठी महत्त्वाची कामगिरी केलेल्या एकनाथ खडसे यांनी काही वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम ठोकून भाजपमध्ये आपण प्रवेश करत असल्याचे जाहीर केले होते. पण अद्यापही एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाची अधिकृत घोषणा करण्यात आली नसल्याने खडसे नाराजही आहेत आणि अस्वस्थही आहेत. पुन्हा एकदा शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसकडे त्यांची पावले वळू लागली आहेत.

विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जेव्हा मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये मंत्री असलेल्या एकनाथ खडसे यांना भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे मंत्रिपद सोडावे लागले होते. त्यानंतरच खडसे आणि फडणवीस यांच्यामध्ये शीतयुद्ध सुरू झाले. त्यातच देवेंद्र फडणवीस यांचा उजवा हात असलेले गिरीश महाजन हे सुद्धा जळगाव जिल्ह्यातील प्रभावशाली राजकीय व्यक्तिमत्त्व असल्याने त्या जिल्ह्यामध्ये एकनाथ खडसे यांची राजकीय कोंडी करण्याचे काम महाजन यांनी केले होते. एकनाथ खडसे यांनी जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तेव्हा महाविकास आघाडीचे सरकार राज्यात होते. तेव्हा गृहमंत्री पदावर असलेल्या अनिल देशमुख यांना सांगून खडसे यांनी गिरीश महाजन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचा कट रचला होता, अशा प्रकारचा आरोपही महाजन यांनी केला. देवेंद्र फडणवीस आणि गिरीश महाजन हे महाराष्ट्रातील प्रभावशाली नेते असल्याने भाजपातील आपल्या प्रवेशाला त्यांचा अडसर ठरत असल्याचे एकनाथ खडसे यांनी अनेक वेळा जाहीर केले आहे. केंद्रातील नेत्यांपेक्षाही फडणवीस आणि महाजन मोठे नेते असल्याचा उपरोधिक टोलाही त्यांनी मारला. दीर्घकाळ राजकारणात असलेल्या एकनाथ खडसे यांच्यासारख्या मोठ्या नेत्याची ही राजकीय मनस्थिती निश्चित समजून घेण्यासारखी आहे.

भाजपच्या स्थापनेपासून या पक्षासोबत असणाऱ्या एकनाथ खडसे यांनी केवळ राजकीय अपरिहार्यतेतून हा पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यांची नाळ मुळातच भारतीय जनता पक्षासोबत जोडली गेली आहे. उत्तर महाराष्ट्रात आणि आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्येसुद्धा पक्षवाढीचे काम करण्यामध्ये एकनाथ खडसे यांचा मोठा वाटा होता. पण पक्षाने आपल्या या कामगिरीची योग्य दखल कधीच घेतली नसल्याची त्यांची तक्रार कायम होती. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतानाच्या कालावधीत एकनाथ खडसे यांच्यावर जे भ्रष्टाचाराचे आरोप झाले तेव्हा आपल्याला फडणवीस यांच्याकडून राजकीय संरक्षण मिळेल असे खडसे यांना वाटत होते; पण तसे झाले नाही. एकनाथ खडसे यांची सध्याची अवस्था 'एकटा' अशीच झाली आहे. कारण एकतर ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारीवरून महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य झाले आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वीच भाजपमध्ये जात असल्याचे जाहीर केले; पण भाजपने मात्र अधिकृतपणे अद्याप खडसे यांना पक्षात घेतलेले नाही. साहजिकच हा राजकीय गोंधळ संपवण्याचे काम स्वतः एकनाथ खडसेच करू शकतात आणि त्या दिशेने त्यांच्या हालचाली होत असल्याचे स्पष्ट होत आहेत. महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार जाऊन त्या ठिकाणी महाविकास आघाडीचे सरकार येणे योग्य ठरेल, अशा प्रकारची जी इच्छा त्यांनी दोन-तीन दिवसांपूर्वी व्यक्त केली त्यातून त्यांची राजकीय भूमिका स्पष्ट होते. खडसे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याचा योग्य सन्मान राखून जर पक्षात प्रवेश झाला नाही तर ते कोणत्याही क्षणी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाऊ शकतात हे उघड आहे. भाजपच्या महाराष्ट्रातील नेत्यांना याची कल्पना नसेल असे नाही; पण अंतर्गत राजकारणामुळेच या सगळ्या गोष्टी घडत आहेत. केंद्रातील नरेंद्र मोदी, अमित शहा किंवा जे. पी. नड्डा या नेत्यांनी दबाव आणला तरच आता एकनाथ खडसे अधिकृतपणे भाजपमध्ये येऊ शकतील अन्यथा ते पुन्हा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाऊन ही सर्व अनिश्चितता संपवून टाकतील. अर्थात एकनाथ खडसे यांच्याबाबत चालू असणारे हे एकहाती अन्यायकारक राजकारण निश्चितच महाराष्ट्रातील पक्षांतर्गत राजकारणाचा एक नकारात्मक पैलू स्पष्ट करणारा आहे, हे नाकारून चालणार नाही.



## बेलेश्वरगणेश मंडळांच्या वतीनेगाव भंडारा जेवणाचा कार्यक्रम संपन्न

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

आष्टी शहरातील मानाचा बेलेश्वर गणेश मंडळांची १९ वर्षांची परंपरा कायम असलेल्या मंडळाच्या वतीने सोमवार दि ९ सप्टेंबर रोजी बेलेश्वर नगर व औदुंबर नगर या भागात भंडारा जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मंडळाचे वैशिष्ट्य श्रींची मूर्ती देणारे दाते २०२५ क्रशा बुकिंग आहे.या मंडळाच्या स्थापनेचे या वर्षीचे १९ वर्षे आहे.विर्सजन मिरवणूक भव्य रथामध्ये होते. दहा दिवसांच्या कालावधीत विविध प्रकारचे समाज प्रबोधन उपक्रम राबवले जातात यामध्ये मतदान जनजागृती, वृक्षारोपण, विविध स्पर्धा व गावं जेवणाचा भंडारा असे भरगच्च कार्यक्रमांने श्रींचे पारंपरिक पद्धतीने विसर्जन केले जाते यामध्ये भव्य दिव्य रथात व बॅजोच्या सिस्टीमने वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येते अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष किरण धोंडे यांनी दिली तर गाव भंडारा जेवणाचे नियोजन उत्कृष्ट पणे करण्यात आले होते यावेळी मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## हो धनु भाऊ ही चूक आम्ही केली, पुढे पण करणारच-खुर्शीद आलम

बीड । प्रतिनिधी

**काल झालेल्या भाजप प्रणित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या अल्पसंख्यांक मेळाव्यात आपण अल्पसंख्यांक समाजाला उद्देशून खास करून मुस्लिम समाजाला सांगितलं की आम्ही लोकसभेला चूक केली पंकजा ताई ला मतदान केले नाही .. हो नाही केलं आणि कदापि करणार नाही आणि ही चूक आम्ही आणि बीड जिल्ह्याचा नव्हे तर अखव्या भारताचा इमानदार बहाद्दर आणि गैय्युर मुस्लिम समाज एक वेळा नाही तर शंभर वेळा ही चूक करणार,**



कारण आमचं ताईशी काही वैर नाही पण ताई ज्यापक्षाकडून निवडणूक लढवीत होत्या त्या भाजपा पक्षाशी आमचं राजकीय वैर आहे, कारण सांगायची गरज नाही मुस्लिम समाज काय अखव्या भारताला माहीत आहे की भाजप जी काय पॉलिसी आहे, आज पर्यंत आम्ही गुजरात ची दंगल विसरू शकलो नाही,मुस्लिम समाजाचा घरं जाळण्यात आली,आमच्या आई बहिणीवर बलात्कार करून त्यांना जिवंत जाळण्यात आले. गर्भवती आई च्या पोट चिरून त्याचं अर्भक तलवारीवर नाच्वण्यात आलं, बिल्कीस बानू बलात्कार प्रकरणात दोषींना सोडुन त्या पापी लोकांचा मुस्लिम समाजाच्या नाकावर टिच्चून जागोजागी सत्कार करण्यात आलं हार तुरे देऊन गौरवण्यात आले,गौरक्षकच्या नावाखाली हजारो तरुणाची हत्या करण्यात आली, ही गोष्ट मुस्लिम समाज कदापि विसरणार नाही,आमच्या धार्मिक विषयात लुळबुळ करण्यात येत आहे तीन तलाक असो, समान नागरिक कायदा (,) असो वक्फ बोर्ड असो, आणि आमच्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहू अलाईहोसल्लम बद्दल गरळ ओकनाऱ्या रामगिरी महाराज ला तुमचा मुख्यमंत्री स्टेज वर जाऊन पाठिंबा देतो, आणि तो तुमचा टील्लिया नितेश राणे मुस्लिमांना मशिदीत घुसून मारण्याची भाषा करतो, त्यावेळेस नाही आठवत तुम्हाला मुस्लिम समाज , त्याचं साधं निषेध करण्यासाठी तुमची जीभ काय घशात पडली होती की काय. ते मूठ भर लोक तुमचे बगलबच्चे स्वतःला मुस्लिम समाजाचे नेते मिरवून घेत आहे आणि त्यांना दिवसा आमदार झाल्याचे स्वप्न पडत आहे, जे स्वतःच्या फायद्यासाठी मुस्लिम समाजाला भाजप च्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यांना आमदारकीचा गाजर दिलं ना तुम्ही ते ऐकतील तुमचं, पण हा बीड जिल्ह्याचा बहाद्दर मुस्लिम समाज ,भाजपा च्या मांडी ला मांडी लावून बसलेल्या तुमचं आणि तुमच्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी ला कधी ही भीक घालणार नाही, आणि ते मुस्लिम समाजाचे मुंबई चे नेते ज्यांनी काँग्रेस शी गद्दरी करून भाजप चा मित्र पक्षासोबत घरोबा करून इथ येऊन सांगतात की मी अजित दादकडून अल्पसंख्यांक समाजाला सत्तेत भागीदारी मागणार , वाह रे नेते भागीदारी आणि कुणासोबत त्या मुस्लिम द्वोशी भाजपा सोबत, सिद्दीकी साहेब एवढंच तुमचं दादा ऐकत असतील तर त्यांना सांगा की मुख्यमंत्री ला सांगून त्या रामगिरी महाराज आणि नितेश राणे ला मुस्लिम समाजाबद्दल आणि आपल्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहु आलय व सल्लम बद्दल प्रक्षोभक विधान केल्याबद्दल अटक करायला सांगा, उगच भाजपा च्या सांगण्यावरून कोणते ही मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाचे मेळावे घेऊन काही फायदा होणार नाही आपल्या ह्या भुलथापाला बीड जिल्ह्याचा मुस्लिम समाज बळी पडणार नाही आणि येणाऱ्या विधान सभेच्या निवडणुकीत हा मुस्लिम समाज मताची भीक घालणार नाही, आणि ठणकावून सांगतो की जी चूक आम्ही लोकसभेला केली तीच चूक आम्ही विधानसभेला सुद्धा करणार आणि एक वेळेस नाही तर शंभर वेळा तीच चूक करणार आणि भाजप प्रणित महायुती ला बीड चा बहाद्दर मुस्लिम मतदार कदापि मताची भिक घालणार नाही.

## शंभर कोटींच्या सौरऊर्जा प्रकल्पाला शासनाची मंजुरी-आ.गोरंटयाल

जालना । प्रतिनिधी



जालना विधानसभा मतदार संघातील घानेवाडी येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा जलाशय परिसरात तब्बल १०० कोटी रुपये खर्चाच्या सौरऊर्जा प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी मिळाली असल्याची माहिती आ. कैलास गोरंटयाल यांनी दिली.

जालना शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी राज्यात काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीची सत्ता असतांना आपण आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात जायकवाडी - जालना ही महत्त्वाकांक्षी योजना मंजूर करून ती कार्यान्वित देखील केली आहे. मात्र,या योजनेद्वारे जालना शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वीज बिलांवर वर्षाकाठी जवळपास कोटयावधी रुपयांचा खर्च महानगर पालिकेला करावा लागत असून या होणाऱ्या खर्चात बचत व्हावी यासाठी आपण घानेवाडी येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा जलाशय परिसरात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्या बाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला होता. सदर प्रस्तावास मंजुरी मिळावी यासाठी आपण शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी दिली असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. २ मेगावॅट वीजनिर्मिती या प्रकल्पाद्वारे होणार असून सद्यस्थितीत १६ एमएलडी पाणी घेतल्यास महिन्याकाठी १ कोटी २५ लक्ष तर ४० ते ६० एमएलडी पाणी घेतल्यास ३ कोटी ५० लक्ष इतका खर्च होणार असून अगोदरच आर्थिक अडचणीत असलेल्या जालना महानगर पालिकेला हा खर्च झेपणारा नाही. राज्य शासनाने मंजूर केलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे दोन मेगावॅट वीज निर्मिती होणार असून यामुळे जायकवाडी - जालना या पाणीपुरवठा योजनेद्वारे करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा वीज बिलावर होणारा खर्च कमी होऊन महापालिकेला मोठी मदत होईल आणि बचत होणारा हा पैसा शहरातील विविध विकास कामांवर खर्च करता येईल असेही आ. कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

## भगवंत सुखाचा सागर; आनंदी व तणावमुक्त जीवन जगा-ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे

बीड । प्रतिनिधी

**आपल्या जीवनात ताण, तणाव दूर ठेवून आनंदी जीवन जगा भगवान पांडुरंग परमात्मा हा आनंद व सुखाचा सागर आहे.हेच सुख आपल्या जीवनात उतरून आनंदी जीवन जगा असा अनमोल संदेश ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे यांनी काल कवडगाव येथील श्री संत बापूराव दादा साळुंके यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त कीर्तन सेवेमध्ये दिला काल दिनांक ७-९-२०२४ शनिवारी श्री संत वैकुंठवासी बापूराव दादा साळुंके यांच्या २१ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त महाराजांनी निरूपणासाठी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा श्रश्रभव सिंधूचे काय कोडे/दावी वाट चाले पुढे//१//तारु भला पांडुरंग/पाव भीजो नदी अंग//२// हा अभंग घेतला होता या अभंगावर सुंदर असे निरूपण करताना महाराज म्हणाले की, मानवी जीवन जगताना सर्व कोडे च आहे, हा संसार सर्वात मोठं कोड आहे परंतु ईश्वर भक्ती केली की हे कोडे प्रत्यक्ष भगवंत येऊन सोडवतो तो प्रत्यक्ष आपल्या मदतीला धावून येतो तो सुखाचा सागर आहे, आनंदाचा डोह आहे, त्यामध्ये आपण रममान होऊन जीवन व्यतीत करा अशा पद्धतीने जीवन जगा की आपल्या नंतर**



**ही आपली कीर्ती या जगात राहिली पाहिजे. तेच खरे जीवन असा अनमोल संदेश महाराजांनी दिला .**

किर्तन सेवेमध्ये अभंग सोडवतांनी महाराजांनी रामायणातील सुंदर असा प्रसंग सांगितला तो असा नाथ बाबांनी रामायण सांगतांना रावणाच्या अशोक वाटीके मधील फुले पांढरी होती असे सांगीतले. हनुमंताने नाथबाबांना सांगितले नाही तेथील फुले लाल रंगाची होती तर सीतामाई यांनी सांगितले की लंके मधील फुलं पांढरी ही नव्हती आणि लाल ही नाही, ती निळ्या रंगाची होती. या मोठ्या कोड्याचे उत्तर भगवान प्रभू रामचंद्रांनी प्रत्यक्ष रामायण करते नाथ महाराज यांना सांगितले ज्याचा जसा भाव आणि दृष्टी आहे त्याला त्याप्रमाणे फुले दिसली. रामायणातील हा प्रसंग ऐकताना सर्व श्रोते मंडळी व भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले होते . या पुण्यतिथी उत्सवा मध्ये कीर्तनाला गायनाची साथ संगत ह.भ.प.रामेश्वर महाराज जाधव, ह.भ.प. कागणे,महाराज, ह.भ. प.पांडुरंग उंडाळकर ,महादेव पोळ यांची होती.मृदंग- घनवट महाराज तर या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित ह.भ.प.हरिदास महाराज सोळके, ह.भ.प. बबन देवा जोशी, ह.भ.प. धुराजी कोळेकर शिरसमार्ग ,विणेकरी वाल्मीक चाटे हे होते . शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य रंगनाथ चादर, जितेंद्र साळुंके ,गोरख साळुंके, ज्ञानेश्वर माऊली साळुंके, गणेश विटेकर ,गेनबा साळुंके, तुळशीदास भाऊ साळुंके व किशोर करोडकर यांचे लाभले.

### संगीत भजन व हरीजागर

दरवर्षी वै.श्री संत ह.भ.प. बापूराव दादा साळुंके यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त आदल्या दिवशी संगीत भजन व जागरणाचा कार्यक्रम आयोजित केला जातो यावर्षी बीडच्या सुमधुर गायिका शालिनीताई जाधव यांच्या सुरेल अभंगवाणी व गवळणी चा कार्यक्रम संपन्न झाला. यांच्याबरोबर सुरेखाताई जाधव ह्या होत्या तसेच त्रिशला उंडाळकर, तारामती घोटणकर ह भ प कवचट महाराज बोरदेवीकर ,मोरेवाडी भजनी मंडळातील सुप्रसिद्ध पेटीवादक राजेश काळे ,मृदंग विशारद ह.भ.प. चतुर्भुज महाराज घनवट, महादेव पोळ, बबन देवा,अनिल नांदूरकर ,सुधाकर आबा कराडकर ,विनोद आप्पा फुटाणे तसेच या संगीत भजनाला मोरेवाडी ,सुर्डी, कवडगाव ,नवीनगावठाण आधी गावची मंडळी उपस्थित होती.



## कन्हेरवाडी सार्वजनिक गणेश मंडळांचा आदर्श इतर मंडळांनी घ्यावा-ह.भ.प. प्रकाश महाराज साठे

### राजेभाऊ फड यांचे कार्य युवकांसाठी दिशादर्शक

परळी वै.। प्रतिनिधी

**कनेरवाडी सार्वजनिक गणेश मंडळाचे कार्य कौतुकास्पद असून इतर मंडळांनी याचप्रमाणे समाजोपयोगी कार्यक्रम घ्यावेत असे आवाहन करून युवक नेते राजेभाऊ फड यांचे कार्य युवकांसाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन प्रख्यात विनोदाचार्य ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांनी केले.**



कनेरवाडी सार्वजनिक गणेश मंडळाच्या उत्सवामध्ये ह. भ. प. प्रकाश महाराज साठे यांचे कीर्तन झाले. युवक नेते राजेभाऊ फड यांच्या मार्गदर्शनाखाली कनेरवाडी येथे गणेशोत्सव फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवा अंतर्गत झालेल्या कीर्तनामध्ये ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांनी विविध विषयावर सविस्तर विवेचन केले. गणेशोत्सवाच्या नावाखाली धांगडधिंगा घातला जात असल्याचे सांगून हे चुकीचे आहे. गणेशोत्सवाचा वापर हा समाज सुधारण्यासाठी व्हावा अशी लोकमान्य टिळकांची अपेक्षा होती त्याप्रमाणे सर्व गणेश मंडळांनी धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम घ्यावेत असे आवाहनही त्यांनी केले. युवक पिढी मोठ्या प्रमाणावर व्यसनांची व्यसनाच्या आहारी जात आहे. यासाठी समाजातील वरिष्ठांनी आपल्या मुलांकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे असे सांगून मुलांनीही आपल्या आई-वडिलांना सांभाळावे असे आवाहन त्यांनी केले. युवक पिढी पाश्चात्य संस्कृतीच्या मागे लागून चुकीच्या मार्गाने जात आहे असे सांगत कनेरवाडीचे सरपंच, युवक नेते राजेभाऊ फड यांचे कार्य हे युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून त्यांच्याप्रमाणे युवकांनी उद्योग आणि व्यवसाय करून समाजसेवा करावी असे आवाहन ह. भ. प. प्रकाश महाराज साठे यांनी केले. ह. भ. प. प्रकाश महाराज साठे यांनी विनोदातुन समाज प्रबोधन केले. यावेळी गावातील व परिसरातील प्रतिष्ठित आणि भजनी मंडळी व भाविक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. घेऊन समाजाला शोभेल असे उपक्रम इतर मंडळांनी आयोजित करावे - ह भ प श्री प्रकाश महाराज साठे

## पान १वरून...

### पंधरा दिवसात

जिल्हा कृषी अधिक्षक बाबासाहेब जेजुरकर, आत्माचे प्रक्लप संचालक सुभाष साळवे यांच्यासह विमा कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पिक विमा कंपण्यांचे प्रतिनिधींना पुढील आठवडयाभरात कृषी विभागाच्या सहकार्याने नमुना सर्वेक्षण करून त्याच्या पुढील १५ दिवसात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमाचा लाभ मिळाण्याबाबत सुचना केल्या. नमुना सर्वेक्षण करताना कुठलेही चुक अथवा दुर्लक्ष विमा कंपण्यांकडून झाली असल्यास अशा कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल केले करावेत असेही निर्देश पालक मंत्री यांनी यावेळी दिले. बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेल्या सर्व महसूल मंडळातील नुकसानीच्या भरपाईचे नैसर्गिक आपत्ती अनुदान मागणीचे अहवाल राज्य शासनास तात्काळ सादर करावेत, असेही निर्देश धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनास दिले आहेत.

-----------

### गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात

राबण्याचा निर्णय घेतला. या योजनेतून अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना २ लाख रुपयांची मदत दिली जाते. या योजनेतून २०२४-२५ या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून या योजनेच्या २०२३-२४ या वर्षातील मंजूर प्रस्तावासाठी २५.७२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच २०२४-२५ साठी मंजूर प्रस्ताव निकाली काढण्यासाठी ३० कोटी इतके अनुदान वितरित करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

**या कारणांसाठी घेता येतो फायदा**

रस्ता किंवा रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतुनाशके हाताळताना किंवा अन्य कारणांमुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरून पडून झालेला अपघात, सर्पदंश व विंचूदंश, नक्षलाईकडून झालेल्या हत्या, जनावरांच्या खाल्ल्यामुळे/चावण्यामुळे जखमी किंवा मृत्यू, बाळंतपणातील मृत्यू.

----------

### मार खा, केस झाली तरी

जरांगे यांनी दिला. फडणवीस साहेबांनी फक्त सगेसोयऱ्यांची मागणी मान्य करावी आणि मराठ्यांना आरक्षण द्यावे, मी त्यापुढे राजकारणावर एक शब्दही बोलणार नाही असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. फडणवीसांनी आपल्याविरोधात मराठा आमदार उभे केलेत, त्यांनी जर आरक्षण दिले नाही तर त्यांना राजकारणात लोळवल्याशिवाय मराठा समाज मागे हटणार नाही असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. बीडमध्ये झालेल्या घोंगडी बैठकीमध्ये मनोज जरांगे यांनी हे वक्तव्य केले आहे. गोरगरीब मराठ्यांनी जागे व्हावे. मार खायची वेळ आली तर खा, केस झाली तर होऊद्या. पण मागे हटू नका, असे आवाहन करीत मनोज जरांगे हे बीड येथील घोंगडी बैठकीच्या सभेत चांगलेच आक्रमक झालेले दिसून आले.

--------

### सहा हजार मतांनी आमची इज्जत

मेळाव्यात बोलत होते. या मेळाव्याला राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसह मुस्लिम समाज बांधवांनी उपस्थिती लावली होती. बीड शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे हा मेळावा पार पडला. यावेळी धनंजय मुंडे यांनी उपस्थितांना संबोधित करताना बीड लोकसभेत झालेल्या पंकजा मुंडे यांच्या पराभवाची सल अद्यापही मनात असल्याचे सांगितले. सहा हजार मतांनी आमची इज्जत गेली. ही जखम खोलवर झालेली आहे. ती अद्याप भरुन निघालेली नाही, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले. मविआ सरकारच्या काळात मौलाना महामंडळासाठी दीड हजार कोटी रुपये मागणी केली होती. मात्र, तत्कालीन सरकारने दमडीही दिली नाही. अजितदादा या सरकारमध्ये आले आणि निधी मंजूर करण्यात आला, असा दावाही यावेळी धनंजय मुंडे यांनी केला.

-------

### राज्यातील वीज कर्मचाऱ्यांना

होणार आहे. या कर्मचाऱ्यांच्या पगारवाढ मार्च २०२४ पासून ही वाढ लागू होणार आहे. पहिली पगारवाढ सुद्धा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना झाली होती. आरोग्यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेत टॉप अप करून वेगळी योजना तयार करण्याचे आदेश दिले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसंदर्भात आज एक बैठक पार पडली. या बैठकीला सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष देशमुख उपस्थितीत, धनंजय मुंडे देखील ऑनलाईन उपस्थित होते.

-----------

### सर्वसाधारण जागेवरही

जाहीर कार्यक्रम घेण्याचे ठरवले आहे. जळगाव जिल्ह्यातील केनगाव येथे ३० सप्टेंबर रोजी, मनमाड येथे २ ऑक्टोबर रोजी आणि नागपूर या ठिकाणी ५ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, विधानसभेच्या २४ मतदार संघामध्ये २२ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. पण १५ टक्क्यांपासून ते २९.९ टक्केपर्यंत लोकसंख्या असलेले २० मतदारसंघ आहेत. आदिवासी भाग हा प्रदूषण विरहीत भाग आहे आणि या भागाला नेहमीच विकासाच्या नावावर लक्ष्य केले जाते. कुठेही अभयारण्य बांधायचे असेल किंवा नवनिर्माण करायचे असेल, तर सर्वांची नजर आदिवासी क्षेत्रावर पडते असा आरोपही त्यांनी केला. ज्या भागात आदिवासी राहतो त्या भागात खनिज मोठ्या प्रमाणात आहेत. खनिजाचे उत्खनन केले जाते. यातून इतर लोक श्रीमंत होतात आणि आदिवासी बेरोजगार, बेघर होत असल्याचेही ते म्हणाले. या वेळी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर, मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे आणि गोंडवाना गणतंत्र पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तुलेश्वरजी मरकाम, महासचिव शामसिंग मरकाम, प्रदेशाध्यक्ष हरीश उईके, भारत आदिवासी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील गायकवाड, कोलाम आदिम जमात संघाचे सुभेदार माधव टेकाम, एकलव्य आघाडीचे अनिल जाधव, आदिवासी एकता परिषदेचे कैलास माळी, आदिवासी माना समाज संघटनेचे रमेश गजबे, आदिवासी गोंडगवारी युवा शक्तीच्या भगवान भोंडे, आदिवासी विद्यार्थी कृती समितीचे विकास कुडमते, जयस संघटनेचे अमित तडवी आदी आदिवासी संघटनांचे आणि पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

---------------

### राज्यातील आरटीओ कर्मचारी

सदर शासन निर्णयाने कर्मचाऱ्यांमध्ये उत्साही वातावरण निर्माण झाले. परंतु मागील दोन वर्षात काही तांत्रिक बाबींचा बाऊ करुन आकृतीबंधाच्या अंमलबजावणीस टोलवाटोलवी करत या शासन निर्णयाची अंमबलबजावणी केली जात नसल्याच्या निषेधार्थ आरटीओ कर्मचारी संघटनेने बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे.

---------

### जायकवाडी ९७ टक्के भरले,

असून, यामुळे शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळाला आहे. मराठवाड्यातील हजारो गावांची तहान भागवणारे धरण म्हणून जायकवाडी धरणाकडे पाहिले जाते. मागील महिन्यात धरण भरेल की नाही अशी शंका उपस्थित केली जात होती. मात्र अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे जायकवाडी धरण ९७.३० टक्के भरले आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मागील वर्षी जायकवाडी धरणात ३२.५५ टक्के पाणीसाठा होता. आता धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. धरणातून सध्या गोदावरी नदीत ३ हजार १४४ क्यूसेकने विसर्ग केला जात असून धरणात पाण्याची होणारी आवक लक्षात घेवून विसर्ग कमी अथवा जास्त केला जाईल, अशी माहिती धरण कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव यांनी दिली आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. १० सप्टेंबर २०२४



## सर्वश्रेष्ठ संविधानामुळेच भारत देशाचे वेगळेपण – प्रा. डॉ.श्रीरंजन आवटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संविधान हीच नागरिकांची ओळख असून संविधानामुळेच भारत देशाचे वेगळेपण आहे असे मत पुणे येथील जेष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.श्रीरंजन आवटे यांनी व्यक्त केले. येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचालित कर्मचारी गणेश व्याख्यानमालेत ते पहिले पुष्प गुंफताना बोलत होते.अध्यक्षस्थानी यो.शि. संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे होते.पुढे आवटे म्हणाले की,संविधानाच्या अभ्या साठी आता तरुणांनी पुढे येण्याची गरज आहे कारण जगाच्या पातळीवर देशातील सर्व नागरिकांची वैचारिक ओळख ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आहे. देशाने कुठे जायचे, काय करायचे हे संविधान सांगते म्हणजे भारतीय संविधान हे सर्वांचे ओळखपत्र आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही देश हा संविधानाच्या चौकटीत चालतो देशाचा ऐतिहासिक,सामाजिक दस्तावेज म्हणजे संविधान आहे.मुल्यांची रूजवणुक संविधानात आहे. त्यामुळेच संविधानामुळे भारताचे वेगळेपण आहे.त्यामुळे संविधान टिकविणे महत्त्वाचे आहे. अध्यक्षीय समारोप डॉ.खुरसाळे यांनी केला प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य पी.आर. थारकर यांनी केले. संचालन प्रा.सविता बुरांडे यांनी तर प्रा.डॉ. शैलजा बरुरे यांनी प्रास्तविक करून आभार मानले यावेळी शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी शहरातील मान्यवर उपस्थित होते.

# आ.क्षीरसागरांनी स्वत: उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली

### कंत्राटदाराचे बिल आणि कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याने थांबले होते काम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात मागील काही दिवसांपासून स्वच्छतेचा आणि कचर्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावरून यामागील कारण शोधून त्यावर तोडगा काढला तसेच सोमवारी (दि.९) रोजी स्वतः रस्त्यावर उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली. यावेळी, येत्या आठ दिवसांत शहरातील स्वच्छता मोहीम पूर्ववत होईल व येत्या दोन ते दिवसांपासून शहरांमध्ये घंटागाडी नियमितपणे कार्यरत होणार असल्याची माहिती आ.क्षीरसागर यांनी दिली.

सध्या गणेशोत्सव तसेच विविध सण-उत्सवांचा काळ आहे. परंतु यातच बीड शहरात गेल्या अनेक दिवसांपासून स्वच्छता





होत नव्हती. तसेच कचरा उचलला जात नव्हता. त्यामुळे शहरात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी यामागील कारण जाणून घेतले. दरम्यान, नगरपरिषदेच्या माध्यमातून ज्या कंत्राटदाराला स्वच्छतेचे काम देण्यात आले होते. त्या कंत्राटदाराचे बिल मागील सात महिन्यांपासून थकले होते. परिणामी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले होते. त्यामुळे बीड शहरात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता. यावर आ.क्षीरसागर यांनी शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निकाली लागावा यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून नगरपरिषद व कंत्राटदाराची संयुक्त बैठक घडवून आणत तोडगा काढला. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकाराने बीड शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागला आहे. सोमवारी (दि.९) रोजी आ.क्षीरसागर यांनी स्वतः उभे राहून स्वच्छता करवून घेतली. तसेच पुढील आठ दिवसांमध्ये शहरात स्वच्छतेची मोहीम पूर्ववत झालेली असेल आणि येत्या दोन-तीन दिवसांपासून शहरात नियमित घंटागाडी कार्यरत होतील असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

## राज्यातील एकही रुग्ण आरोग्य सुविधेविना दगावणार नाही यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांचे प्रयत्न

### मंगेश चिवटे यांचे उदगार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री मा ना एकनाथराव शिंदे यांच्या मुळे मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाच्या माध्यमातून मागील सव्वादोन वर्षात ३२१ कोटी रुपयांची आर्थिक मदत गरजू रुणाना झाली असून राज्यातील एक रुण आरोग्य सुविधे विना दगावनार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत असे उदगार मुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष प्रमुख तथा विषेश कार्यकारी अधिकारी मंगेशजी चिवटे यांनी काढले.

शिवसेना वैद्यकीय कक्ष व रामहारी राऊत प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई शिवसेनेच्या पुढाकारातुन आयोजित करण्यात आलेल्या जयपूर फूट वाटप कार्यक्रम प्रसंगी मंगेशजी चिवटे हे बोलत होते.

या प्रसंगी मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख रामहारी राऊत, व्याख्याते किरण कोरे, सौ.रत्नमाला मुंडे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे, डॉ सिद्धेश्वर



बिराजदार, डॉ घुगे, डॉ राजेश इंगोले, डॉ अतुल शिंदे, डॉ दीपक लामतुरे, डॉ संदीप मोरे, ऍड जयंत भारजकर, नगरसेवक बबन लोमटे, अनंत वेडे, अनंत लोमटे, सामाजिक कार्यकर्ते दाजीसाहेब लोमटे, संजय साळवे, शेख मुक्तारभाई यांच्या सह असंख्य मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना मंगेशजी चिवटे म्हणाले की, माझं काम हे टीम वर्क आहे, खांद्याला खांदा लावून सर्वजण काम करत आहेत. आज पर्यंत मुख्यमंत्री सहाय्यता निधीततून ५ हजार मोफत सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या आहेत. सव्वा दोन वर्षात ३२१ कोटींची मदत वाटप केली गेली, आम्ही मदत करताना कुठलीही जात पात धर्म पक्ष पाहात नाहीत. एकनाथ शिंदे साहेबांनी हिंदू मुस्लिम यांचं धृवीकरणं कधी होऊ दिल नाही, महिला साठी सुरू करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेचा हप्ता ३ हजार पर्यंत केला जाणार आहे. १० हजार कृत्रिम हात पाय शिल्लक आहे, अंबाजोगाई केज व पंचक्रोशितील कोणीही दिव्यांग राहणार नाही याची काळजी ऋषिकेश लोमटे यांनी घ्यावी.

या वेळी बोलताना किरण कोरे म्हणाले की प्रत्येक माणूस दु:ख घेऊन वावरत आहे, आपल्या सर्वां पेक्षा दिव्यांगाच दु:ख वेगळं आहे. या वेळी डॉ शंकर धपाटे, डॉ राजेश इंगोले, बबन भेय्या लोमटे, दत्तात्रय अंबेकर आदींनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप दाजीसाहेब लोमटे यांनी केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऋषिकेश लोमटे यांनी तर आभार गजानन मुडेगावकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मामा काळे यांनी केले,

# बिंदुसरा व कुंडलीका प्रकल्प भरल्याने माजलगाव धरण भरण्याच्या अशा पल्लवित

### धरणाची टक्केवारी ३७.६६ टक्के; धरणात पाण्याची ३२६९ क्युसेकने आवक सुरू

**ज्योतिराम पांढरपोटे**
**माजलगाव**

पावसाचा शेवटचा टप्पा आला तरी माजलगाव धरण मृत साठ्यातच होते.त्यामुळे भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नाची माजलगावकरांना मोठी चिंता लागून होती.परंतु दि ०१ सप्टेंबर रविवार रोजी धरण परिक्षेत्रात झालेल्या सततधार पावसामुळे व जायकवाडीतून सुरू असलेल्या पाण्याची आवकमुळे माजलगाव धरण एकाच दिवसात मृत साठ्यातून उपयुक्त साठ्यात आले होते. दरम्यान दि ०९ सप्टेंबर सोमवार रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत माजलगाव धरण ३७.६६ % टक्के एवढे असुन धरणात पाण्याची आवक ३२६९ क्युसेकने सुरूच असून बीडसह माजलगाव शहरासह १८ खेडी पाणीपुरवठ्याच्या भेडसावणारा पाणी प्रश्न मिटवणार आहे ही सुखद बाब आहे.तर बिंदुसरा व कुंडलीका प्रकल्प भरल्याने माजलगाव धरण १००% भरण्याच्या अशा पल्लवित झाल्या आहेत.

बीड माजलगाव शहराची ताहान भागवणारे माजलगाव धरण पावसाळा संपत आला तरी कोरडे ठाकच होते. धुंवाधार नक्षत्र असणाऱ्या मौसमी पावसातल्या



ऑगस्ट अखेर धरणाची पाणी पातळी ही मृत साठ्यातच होती. माजलगावकरांसाठी मोठी चिंतेची बाब होती. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासह,जनावरे , शेतीला लागणाऱ्या पाण्याची मोठी समस्या उभी राहणार होती.परंतु दि १ सप्टेंबर रविवार रोजी वरुण राजाने राज्यात खास करून मराठवाड्यात धुवाधार बॅटिंग करण्यास सुरुवात केली.धरण परिक्षेत्रात सततधार पडणाऱ्या पावसामुळे व जायकवाडीतून सुरू असलेल्या फ्लोमुळे माजलगाव धरण एकाच

**माजलगाव धरणाची दि ०९ सप्टेंबर सोमवार रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंतची स्थिती**

१)धरणाची एकुण पाणीपातळी -४२८.८५मी/४३१.८० मी.
२) धरणातील एकूण पाणीसाठा -२५९.५० ३/४५४ ३.
३)उपयुक्त पाणीसाठा:- ११७.५ ३/३१२.०० ३
४) धरणाची टक्केवारी- ३७.६६ %
५) धरणात येणारी पाण्याची आवक:-३२६९.०० क्युसेक

दिवसात मृतसाठ्यातून उपयुक्त साठ्यात आले आहे.दरम्यान दि ०९ सप्टेंबर सोमवार रोजी सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास माजलगाव धरणाची पाणी पातळी ३७.६६ टक्क्यावर पोहोचली आहे.तर धरणात येणारी पाण्याची आवक ३२६९ क्युसेकने सुरु आहे.त्यामुळे माजलगावकरांसाठी ही सुखद बाब म्हणावी लागेल.तर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील उध्र्व कुंडलीका प्रकल्प सोन्नाखोटा,बिंधुसरा प्रकल्प बीड व कुंडलीका प्रकल्प उपळी हे १००% भरल्याने माजलगाव धरण १००% भरण्याच्या अशा पल्लवित झाल्या आहेत

# गोदावरी नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सतर्कता बाळगावी -जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ

**जालना । प्रतिनिधी**

जायकवाडी प्रकल्प अर्थात नाथसागर जलाशय ९७.३० टक्के क्षमतेने सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजता भरला आहे. तसेच पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसाच्या पाण्याची आवक व उर्ध्व भागातील धरणांमधुन येणारी आवक बघता आज दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी ठिक १२ ते १ वाजेदरम्यान जायकवाडी धरणाच्या सांडव्याद्वारे गोदावरी नदी पात्रात ३१४४ क्युसेक विसर्ग सुरू करण्यात येणार आहे. पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढविणे, कमी करणेबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल. तरी नदी काठच्या गावांतील नागरिकांनी सावध राहावे. कुणीही गोदावरी नदीपात्रात प्रवेश



करू नये व कुठलीही जिवीत व वित्त हानी होऊ नये, यासाठी गोदावरी नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

नदीकाठच्या परिसरातील सर्व लोकांनी सतर्क राहावे तसेच चल- मालमत्ता, चिजवस्तू, वाहने, जनावरे, पाळीवप्राणी व शेतीची अवजारे इत्यादी साधन सामग्री सुरक्षित स्थळी पाठवावेत. पुरापासून सावध राहावे, आणि धरणाच्या खालील नदी काठावरील नागरी भागामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पूर विसर्गाबाबत व सदरील इशा-याचे गांर्भीय लक्षात घेता नागरिकांच्या जिवित व मालमत्तेची हानी टाळण्यासाठी योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ कराव्यात. अशा सुचना उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकारी यांना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या आहेत.

खडकपूर्णा प्रकल्पातुनही पाण्याचा विसर्ग

खडकपूर्णा प्रकल्पाची एकुण २ वक्रद्वारे ३० से.मी.ने उघडली असून नदीपात्रात ३५९९.७८ क्युसेक एवढा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. तरी धरणाखालील नदीकाठच्या परिसरातील सर्व लोकांनी सतर्क राहावे तसेच चल- मालमत्ता, चिजवस्तू, वाहने, जनावरे, पाळीवप्राणी व शेतीची अवजारे इत्यादी साधन सामग्री सुरक्षित स्थळी पाठवावेत. पुरापासून सावध राहावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १२२४/२०२४**
**( मार्फत विधिज्ञ:- श्री एस.डी. जगताप)**

अर्जदार :-१. भिमराव नागनाथ जोगदंड, वय ५६ वर्षे, धंदा शेती,२. जनाबाई नागनाथ जोगदंड, वय सर्व रा. वाणगांव, ता. जि. बीड, ७१ वर्षे, धंदा शेती,

विरुध्द निरंक

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे नागनाथ श्रीपती जोगदंड हे/या दि. ३०/०५/२०२३ रोजी बीड येथे मयत असुन अर्जदार क. २ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क. १ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ३०/०८/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीखः- ०४/१०/२०२४.

**आदेशावरुन,**
**अधिक्षक, दिवाणी**
**न्यायालय, व. स्तर, बीड**

# माजी मंत्री बाबा सिद्दीकींची डॉ.योगेश क्षीरसागरांच्या संपर्क कार्यालयास भेट

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री बाबा सिद्दीकी हे बीड जिल्ह्याच्या दौर्यावर सोमवारी (दि.९) आले होते. त्यांनी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा डॉ.क्षीरसागर, अल्पसंख्याक सेल जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांच्यासह पदाधिकार्यांकडून सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना बाबा सिद्दीकी म्हणाले, मुंबईत विमानतळावर माझी आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांची योगायोगाने भेट झाली. बीडमध्ये येत असल्याने त्यांनी माझे स्वागत केले. जिल्ह्यात माझे स्व.केशरकाकू, स्व.गोपीनाथ मुंडे यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. त्यानंतर डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्याशी माझे संबंध राहिले. स्व.गोपीनाथ मुंडे यांचे मला कायम सहकार्य लाभले. पालकमंत्री धनंजय मुंडे हे आज लोकसभा निवडणुकीतील पराभवावरून नाराज दिसून आले. मी देखील माझ्या पराभवानंतर नाराज झालो होतो. परंतु त्यांची नाराजी आता मतदारांनी दूर करावी. राजकारणात कुणी कोणाचा मित्र-शत्रू नसतो. मुस्लिमांचे मतदान घेणार्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे ९ खासदार वक्फ बोर्डाच्या मुद्द्यावर सभागृहात गप्प राहिले, हे आपला वापर करतात



हे अल्पसंख्याक समाजाने लक्षात घ्यायला हवे, सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्याचा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा विचार आहे. पक्षाच्या माध्यमातून जनहिताची कामे करू, असे सांगून डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पक्षातील कार्य कौतुकास्पद आहे, त्यांना बीडकरांनी साथ द्यावी, असे आवाहन बाबा सिद्दीकी यांनी केले. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इक्बाल शेख, अल्पसंख्यांक महिला जिल्हाध्यक्षा शाकेरा शेख, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष सपकाळ, माजी उपनगराध्यक्ष प्रा.किशोर काळे, ज्येष्ठ नगरसेवक सादेक जमा, सय्यद इलियास, जैतुल्ला खान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धूत, रणजित बनसोडे, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष माजेद कुरेशी, नबील जमा, जि.प.चे माजी सदस्य अॅड.राजेंद्र राऊत, पं.स.चे माजी सदस्य अच्युत शेळके, माजी नगरसेवक रामसिंग टाक, नवगणचे संचालक आमेर सिद्दीकी, शारेक जकेरिया, शुभम कातांगळे, साजेद जागीरदार, समीर तांबोळी, बाबा खान, जावेद खान, जावेद शेख, ईसा चाउस, ए.वन.मुजीब, युनूस शेख, सादेक सिद्दीकी, विठ्ठल गुजर, वैभव मस्के, अच्युतराव रसाळ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

बाबा सिद्दीकी यांच्या अनुभवाचा पक्षाला फायदा-योगेश क्षीरसागर

बाबा सिद्दीकी यांच्या अनुभवाचा राष्ट्रवादी कॉंग्रेसला फायदा होणार आहे. त्यांनी बीड जिल्ह्यात संघटन मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन करावे. पक्षापासून दुरावलेला मतदार जोडण्यासाठी त्यांचे प्रयत्न कामी येतील. त्यांनी शहरातील अल्पसंख्याक स्मशानभूमी, उर्दू घर आदी प्रश्नांची सोडणूक करण्यासाठी सहकार्य करावे अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली.

पान ६ वरुन...

### ना.रामदासजी आठवले

प्रदर्शन करणार. यावेळी राजू जोगदंड, अशोक साळवे,किसन तांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, महादेव उजगरे, दीपक कांबळे, अरुण भालेराव, धोंडीराम शिरसाट, नरेंद्र जावळे, दशरथ सोनवणे, भास्कर रोडे,दासू वाघमारे, अरुण भैय्या निकाळजे, सचिन कागदे, महेश आठवले, बापू पवार, उत्तम आप्पा मस्के, गोवर्धन वाघमारे, मायाताई मिसळे, मीनाताई कांबळे, रेश्मा जोगदंड, मुकुंद हातागळे, दशरथ शिंदे, पठाण भाभी, संदिपान डोंगरे, एस.बी.साळवे, दयानंद सोनवणे, ज्ञानोबा माने, ऍड. सुरेश वडमारे रवींद्र जोगदंड, गौतम बचुटे, दिलीप बनसोडे, भगवान ससाने, गणेश लांडगे,सादिक कुरेशी,जयभीम मस्के, विकास वाघमारे, राजेश उजगरे, अविनाश जोगदंड, सुभाष तांगडे, सतीश शिंगारे, विलास जोगदंड, महेंद्र वडमारे, अक्षय कोकाटे, बाबा देशमाने, नामदेव वाघमारे, रमेश निशिगंध, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, भाऊसाहेब कांबळे, भीमराव घोडेराव, राहुल कांबळे, भास्कर जावळे,आकाश साबळे, सचिन वडमारे, बप्पा जावळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### स्नेहा पालीमकरने वर्ल्ड वेब

पुण्यातील सीईओपी कॉलेज मध्ये साहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करते. या नंतर तिने आषाढीला विठ्ठल रूक्मिणी तर येत्या अभियंता दिनी १५ सप्टेंबर ०२४ ला भारतरत्न तथा महान अभियंता मोक्षगुंडम विश्वेश्वरेया यांचे रेखाटले चित्र सादर करणार आहे.

### मराठा आरक्षण जनजागृतीसाठी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे होणाऱ्या घोंगडी बैठकीसाठी आष्टी तालुक्यातील मराठा युवकांनी अनोखी शक्कल लढवली.त्यांनी आपल्या स्वतःच्या मोटरसायकलला रथ बनवून मराठा आरक्षण जनजागृती करण्यासाठी संपूर्ण तालुक्यात निमंत्रण देत आहेत.यासाठी मोटरसायकलला विशिष्ट पद्धतीने साच्या बसून रथ बनविला.त्यावर मराठा योद्धा मनोज जरांगे यांचे बॅनर लावून रथ यात्रेच्या माध्यमातून घोंगडी बैठकीस आमंत्रित करण्यात येत आहे.

### होमिओपॅथी महाविद्यालयाच्या

गुप्ता महाराष्ट्रातील आयुष्यमान भारत या योजनेचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे व राष्ट्रीय आयोगाच्या मेडिकल असेसमेंट ॲण्ड रेटिंग बोर्डाचे सदस्य डॉ.आंनद चतुर्वेदी, आयोगाचे रजिस्ट्रेशन बोर्डाचे सदस्य डॉ.सेंथीलकुमार,आयोगाच्या एज्युकेशन बोर्डाचे डॉ.मंगेश जतकर, राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.राजकुमार पाटील हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमात या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या व प्रथितयश संपादन केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना मंत्री महोदयाच्या हस्ते अवॉर्ड ऑफ एक्सलन्स या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच डिप्लोमा, डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या व पीएचडी झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाविद्यालाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे व प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल यांनी दिली आहे. सकाळी १० वाजता नॅशनल होमिओपॅथिक सेमिनारचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये याच महाविद्यालयातुन उत्तीर्ण झालेल्या व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या माजी विद्यार्थ्यांचे विविध विषयांवर व्याख्यान होणार आहे तर दुपारी १२ ते १ या वेळात माजी विद्यार्थ्यांचे मनोगत तसेच दुपारी २ वा कार्यक्रमाचे उद्घाटन आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी केंद्रातील शहरी विकास राज्यमंत्री टोकन शाहू हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. संध्याकाळी ७ ते १० या वेळात कल्चरल प्रोग्रामचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संस्थचे अध्यक्ष नानासाहेब काकडे यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला

प्रमुख उडिद, सोयाबीन, तूर, मका, बाजरी, कांदा, भुईमूग यासारख्या नगदी पिकांना धोका पोहोचला असून बऱ्याच शेतजमिनीतील अशी पिकेपाणी साचल्याने कुजली आहेत. त्यातच या अतिपावसामुळे पिकांवर रोग पडला आहे. जनावरांसाठी लागणाऱ्या चाऱ्याचा प्रश्न देखील गंभीर होऊ लागला आहे. अशा परिस्थितीत सुद्धा पिकांचे नुकसानीचे पंचनामे केले जात नाहीत हे तालुक्यातील शेतकऱ्यांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

### माजलगाव मतदार संघात

राहील.त्यांना १९.१५ टक्के मतदारांची पसंती आहे.जर महा युतीने बाबरी मुंडे यांना उमेदवारी दिली तर ते चौथ्या क्रमांकावर राहतील.त्यांना ८.९८ मतदारांची पसंती आहे. महा युतीत अजीत पवार राष्ट्रवादी ने जर जयसिंग सोळंके यांना उमेदवारी दिली तर ते पाचव्या स्थानावर राहतील.त्यांना ६.७८ टक्के मतदारांची पसंती आहे.महा युतीत भाजप ने रमेश आडसकर यांना उमेदवारी दिली तर ते सहाव्या क्रमांकावर राहतील.त्यांना ५.५९ टक्के मतदारांनी पसंती दिली आहे. महायुतीत भाजप ने जर मोहन जगताप यांना उमेदवारी दिली तर ते सातव्या स्थानावर राहतील.त्यांना १.६९ टक्के मतदारांनी पसंती दिली आहे.एकंदर माजलगाव मतदार संघात बदल घडून तुतारी वाजेल व महा विकास आघाडीने सोशल इंजिनीअरिंग करून प्रा.ईश्वर मुंडे यांचा उच्च शिक्षीत ओबीसी व नवीन चेहरा निवडणूकीत उतरवला तर ते सगळ्यांना भारी पडतील असा अंदाज सर्वे मधून समोर आला आहे.

cmyk

# महाराष्ट्रात कांदा पीक विमा घोटाळा?

## कृषी विभागाने सादर केली आकडेवारी, या ८ जिल्ह्यांत क्षेत्राच्या तुलनेत काढला एवढा पीकविमा

राज्यात मागील वर्षीपासून सलग कांद्याच्या दरांवरून शेतकऱ्यांची नाराजी असताना राज्यातील ८ जिल्ह्यांत कांदा पीक विम्यात मोठा घोटाळा झाल्याचा खुद्द कृषी आयुक्तालयाचा संशय आहे. कारण महाराष्ट्रातल्या आठ जिल्ह्यात कांदा लागवड क्षेत्रापेक्षा तब्बल ३३९ टक्के अधिक विमा उतरवल्याचं कृषी आयुक्तालयानं एका पत्राद्वारे म्हटलंय. त्यामुळे त्यांनी आठही जिल्ह्याच्या कृषी संचालकांना कडक तपासणी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

कांद्याच्या पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ४६००० ते ८१००० असल्याने मोठ्या प्रमाणावर लागवडीपेक्षा विमा जास्त उतरवल्याचं समोर आलं आहे. तपासणी दरम्यान आठ जिल्ह्यांचं लागवड क्षेत्र हे ७५ हजार ३१२ हेक्टर असताना विमा काढलेला क्षेत्र हे दोन लाख ६३ हजार १३६ हेक्टर एवढा आहे. याचाच अर्थ कांदा पिकाची प्रत्यक्ष लागवड न करता अनेकांनी पीक विमा घेतल्याचं निदर्शनात येत असल्याचं कृषी खात्याचे मत आहे.

महाराष्ट्रातल्या कोणत्या जिल्ह्यात अधिक पटीने विमा उतरवला गेलाय? सरकारी आकडेवारीनुसार नाशिक जिल्यात लागवड क्षेत्र आहे १६४ हेक्टर मात्र विमा संरक्षित केलेले क्षेत्र आहे ४६ हजार ५४६ हेक्टर इथे २८ हजार ३८२% अधिक प्रमाणात



विमा उतरवला गेला. धुळे कांदा लागवड क्षेत्र आहे ५३० हेक्टर विमा उतरवला गेलाय ८६३१ हेक्टर. लागवड क्षेत्रापेक्षा ११६२८ टक्के विमा येथे जास्त उतरवला गेला अहमदनगर कांद्याचे लागवड क्षेत्र आहे २३ हजार ४८४ हेक्टर विमा उतरवला गेला आहे ३६ हजार २४३ हेक्टर इथेही १५४% जास्त विमा उतरवला गेलाय. पुणे जिल्ह्यात कांद्याचे लागवड क्षेत्र आहे ६७४८ सेक्टर विमा उतरवला गेला ३८२१५ हेक्टर आणि लागवड क्षेत्रापेक्षा ५६६% जास्तीचा उमा उतरवला गेला सोलापूर जिल्ह्यात लागवड क्षेत्र आहे ३५९५ हेक्टर, विमा उतरवला गेला ८५६४३ हेक्टर इथेही २४१ टक्के जास्त विमा उतरवला गेला. सातारा जिल्यात लागवड क्षेत्र आहे १७९६ हेक्टर विमा उतरवला गेला १व हजार ४३२ हेक्टर इथेही ६९२% जास्त विमा उतरवला गेला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कांदा लागवड क्षेत्र आहे २३३७ हेक्टर विमा उतरवला गेला ११४४ हेक्टर इथेही ४९०% जास्त विमा उतरवला गेला बीड जिल्ह्यात कांदा लागवड क्षेत्र आहे ४६५९ हेक्टर .विमा उतरवला गेला २३ हजार ८८३ हेक्टर .५१५ टक्के जास्त विमा उतरावे गेला .

कांदा पिकात का उतरवला गेला विमा?

कांदा पिकातच एवढ्या मोठ्या प्रमाणावर विमा का उतरवला गेला काय आहे त्याची काय कारण आहेत? इतर खरीप पिकाच्या तुलनेत कांदा पिकासाठी विमा संरक्षणाची रक्कम ही सर्वात जास्त आहे .अगदी ५० टक्के रक्कम मिळाली तरीही रक्कम खूप मोठी असते.शिवाय कितीही रकमेचे विमाचे संरक्षण घेतले तरी शासन शंभर टक्के विमा हप्ता भरते त्यामुळे कोणतीही अधिकचा बोजा विमा घेणाऱ्यावर पडत नाही.

गावनिहाय तपासणी करत कारवाईची मागणी

मात्र पिकाची लागवड न करता टीका करता विमा उतरवणे ही शासनाची फसवणूक असल्याचं आणि अनुदानाचा अपहार असल्याचं पत्रात लिहिले गेले आहे. त्यामुळे बोगस विमा विमा उतरवणाऱ्यांवर जिल्हास्तरीय समितीने गावनिहाय तपासणी करून कारवाई करावी आणि याबाबत कार्यालयास अवगत करण्याचं कृषी संचालकांनी आपल्या पत्रात लिहिलंय.

# कपाशीच्या पाते, फुल आणि बोंड लागण्याच्या कालावधीमध्ये घ्या काळजी

सध्या महाराष्ट्र मध्ये पावसाने खंड दिलेला आहे. त्यामुळे कपाशी सोबतच इतर पिकांना देखील पाण्याची दुर्भिक्ष जाणवत आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या उत्पादनाला याचा फटका बसण्याची शक्यता आहे. परंतु अशाही परिस्थितीमध्ये जर आपण कापूस या पिकाचा विचार केला तर हा कालावधी कापूस पिकासाठी खूप महत्त्वाचा असून व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून देखील या कालावधीचे महत्त्व खूप अनन्यसाधारण असे आहे.

साधारणपणे हा कालावधी कापूस पिकाला पाते, बोंड लागण्याचा कालावधी असून यावरच कपाशीचे पुढील उत्पादन अवलंबून असते. त्यामुळे हवामानातील बदल किंवा एखाद्या वेळेस जास्त पाऊस पडून गेल्यानंतर उद्भवणारी स्थिति किंवा पाण्याचा ताण पडल्यानंतर कापूस पिकावरील पाते आणि बोंडगळीची समस्या निर्माण होते. ही समस्या जर जास्त प्रमाणात उद्भवली तर नक्कीच उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा कपाशीला अगदी सुरुवातीच्या काळामध्ये जे फुल येतात त्यांचे रूपांतर पाते आणि बोंडामध्ये होत असते. परंतु गेल्या काही वर्षापासून आपण बघत आहोत की याच कालावधीमध्ये नेमके पाने लाल पडण्याची विकृती म्हणजेच आपण त्याला लाल्या रोग म्हणतो याचा अटॅक कपाशीवर होताना दिसून येतो. याच्या नियंत्रणाकरिता आपल्याला मुख्य अन्नद्रव्य देणे गरजेचे आहेच परंतु त्यासोबतच इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी देखील आवश्यक आहे. कपाशीवर लाल्या रोग येऊ नये याकरिता मॅग्नेशियम सल्फेट एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम आणि त्यासोबत युरिया एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. ही फवारणी करताना कुठल्याही प्रकारचा कीडनाशकाचा यामध्ये समावेश करू नये. दुसरे महत्त्वाचे म्हणजे पीक जेव्हा फुलोरा अवस्थेमध्ये असते तेव्हा दोन टक्के युरिया किंवा दोन टक्के डीएपी म्हणजेच वीस ग्रॅम



प्रति लिटर पाणी किंवा १९:१९:१९ पाच ग्रॅम प्रति लिटर पाणी प्रमाणे या अन्नद्रव्यांचे लागवडीच्या ४५ व ६५ व्या दिवशी फवारणी करावी. तसेच फुलोरा अवस्थेमध्ये पीक असेल तर ००:५२:३४ चार ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. फुलोरा अवस्थे नंतर पाते व बोंडे तयार होतात व ही अवस्था खूप महत्त्वाची असते. या कालावधीमध्ये पोटॅशियम नायट्रेट एक टक्का म्हणजेच दहा ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. अनेक नैसर्गिक कारणांमुळे किंवा इतर कारणांमुळे देखील कपाशीची पाते, बोंडांची मोठ्या प्रमाणावर गळ होते. हे टाळण्याकरिता नॅपथील ऍसिटिक ऍसिड म्हणजेच एनएए तीन ते चार मिली प्रति दहा लिटर पाणी या प्रमाणामध्ये पहिली फवारणी करावी व त्यानंतर पंधरा ते वीस दिवस झाल्यानंतर दुसरी फवारणी घ्यावी. बऱ्याचदा आपल्याला कपाशीची कायिक वाढ खूप मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये कपाशीला बोंडांची संख्या खूप कमी प्रमाणात लागते. त्यामुळे यावर उपाय म्हणून क्लोरमेकॉट क्लोराईड (५०% एसएल) या वाढनियंत्रकाची दहा मिली प्रति दहा लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करून घ्यावी. कपाशीचे जे काही बोंड असतात त्यांची वाढ पूर्ण झाल्यानंतर बाहेरच्या बाजूने बोंडे सडायला लागण्याचे प्रमाण दिसून येते. हा प्रादुर्भाव टाळण्याकरता प्रोपीकोनॅझोल (२५ टक्के ई.सी.) एक मिली किंवा प्रोपीनेब (७० डब्ल्यू पी) अडीच ते तीन ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

# पिकविमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळकवणूक

## सर्वेच्या नावावर पैसे घेतानाचा व्हिडिओ व्हायरल

शेतकर्यांना पीक विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून पंचनामे करण्यासाठी पैसे मागितले जात असल्याचा एक खळबळजनक व्हिडिओ समोर आला आहे. यात बुलढाण्याच्या सिंदखेडराजा तालुक्यातील विविध गांवामध्ये हा धक्कादायक प्रकार घडत आहे. या प्रकरणाचा व्हिडिओ सध्या समाज माध्यमांमध्ये चांगलाच व्हायरल झाल्यानंतर हे प्रकरण उजेडात आले आहे. दरम्यान, या प्रकरणी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आता शेतकरी वर्गातून होत आहे. तर दुसरीकडे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना वेळीच मदत मिळावी यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असताना नुकसानीच्या सर्वे करताही रक्कम मोजावी लगत असल्याने शेतकरी वर्गातून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

सिंदखेडराजा तालुक्यामध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकर्यांनी पिक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार दाखल केल्या होत्या. यावर पिक विमा कंपनीतून कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांच्या बांधावर पाठवले गेले. त्यानंतर शेतातील पिकांच्या नुकसानीचे पंचनामे



करताना मात्र पैसे घेतले जात असल्याचे समोर आले आहे. पीक विमा कर्मचार्यांकडून एका शेतकर्याला एका गटासाठी २०० ते ३०० रुपयांची मागणी केली जात असल्याचं व्हायरल व्हिडीओमध्ये दिसतय. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता शेतकरी वर्गातून होत आहे. यवतमाळच्या मारेगाव तालुक्यातील वनोजा देवी येथे वारंवार सूचना देऊनही, पोलिसांना न जुमानता वनोजादेवी येथील बस थांब्याजवळ अवैध देशी, विदेशी दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीच्या दुकानाला गावातील महिलांनी आग लावली. यावेळी अवैध दारू विक्री करणारा आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. मारेगाव तालुक्यातील वनोजा देवी चौकीवर अवैध दारू विक्री थांबविण्याची मागणी महिलांनी पोलिसांकडे केली होती. पोलिसांनी कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही. त्यानंतर या प्रकरणी मनसेच्या महिला पदाधिकारी चांगल्याच आक्रमक झाल्या असून तालुकाप्रमुख उज्ज्वला चंदनखेडे, यांच्या नेतृत्वात महिलांनी त्याठिकाणी धाड टाकली. अवैध दारू विक्रेता चंद्रकांत सुधाकर भोसले हा येथुन पळ काढला. तर यावेळी देशी दारूचे ५२ बॉटल आणि विदेशी दारूच्या ६ बॉटल जप्त करीत महिलांनी दारूच्या दुकानाला आग लावली आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४६ : एलियास होवे याला अमेरिकेत शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८९८ : लुइगी लुकेनीने ऑस्ट्रियाची राणी एलिझाबेथची हत्या केली.
१९३९ : दुसरे महायुद्ध कॅनडाने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४३ : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी रोम ताब्यात घेण्यास सुरूवात केली.
१९३६ : प्रथम जागतिक वैयक्तिक मोटरसायकल स्पीडवे चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली.
१९६६ : पंजाब राज्याचे विभाजन होऊन पंजाब व हरियाणा अशी दोन राज्ये अस्तित्वात आली.
१९६७ : जनमत चाचणीत जिब्राल्टरच्या जनतेने स्पेनमधे सामील होण्याऐवजी ब्रिटनमधेच राहण्याचा निर्णय घेतला.
१९७५ : व्हायकिंग-२ हे अमेरिकन मानवविरहित अंतराळयान मंगळ ग्रहाकडे झेपावले.
१९९६ : गोमंतक मराठी अकादमीचा पहिला 'कृष्णदास शामा पुरस्कार' गोमंतकीय मराठी साहित्यिक बा. द. सातोस्कर यांना तर 'पंडित महादेवशास्त्री जोशी मराठी साहित्य पुरस्कार' कवी नारायण सुर्वे यांना जाहीर
२००१ : मार्क इन्ग्रॅम या स्पर्धकाने फसवणूक करुन इंग्लंडमधील कौन बनेगा करोडपती ही स्पर्धा जिंकली.
२००२ : परंपरेने तटस्थ देश स्वित्झर्लंड देश युनायटेड नेशन्समध्ये सामील झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७२ : के. एस. रणजितसिंहजी कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (मृत्यू: २ एप्रिल १९३३)
१८८७ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे दुसरे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न (१९५७), मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (मृत्यू: ७ मार्च १९६१)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आर्थर कॉम्प्टन यांचा जन्म.
१८९५ : कविसम्राट तेलुगू लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू मनीष पांडे यांचा जन्म.
१९१२ : बसप्पा दानप्पा तथा बी. डी. जत्ती भारताचे ५ वे उपराष्ट्रपती, पाँडेचरी व ओरिसाचे राज्यपाल आणि मैसूर प्रांताचे मुख्यमंत्री, राष्ट्रपती फख्रुद्दीन अली अहमद यांच्या आकस्मिक निधनामुळे जत्ती यांच्यावर राष्ट्रपतीपदाची जबाबदारी आली. पाच महिने ते हंगामी राष्ट्रपती (मृत्यू: ७ जून २००२)
१९४८ : भक्ती बर्वे अभिनेत्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन


२१० : २१० इ.स.पू. : चीनची पहिले सम्राट किन शी हुआंग यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी २५९)
१९०० : रावबहादूर डॉ. विश्राम रामजी घोले महात्मा फुले यांचे सहकारी व नामवंत शल्यचिकित्सक (जन्म:)
१९२३ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (जन्म: ३० आक्टोबर १८८७)
१९६४ : श्रीधर पार्सेकर व्हायोलिनवादक (जन्म: ? ? १९२०)
१९८३ : नोबेल पारितोषिक विजेते स्वीस भौतिकशास्त्रज्ञ फेलिक्स ब्लॉक यांचे निधन.
२००० : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमीदल्ला यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १९२१)
२००६ : टोंगाचा राजा टॉफाहाऊ टुपोऊ यांचे निधन.

# गाजर गवतापासून कंपोस्ट निर्मिती तंत्र

गाजर गवत शेतामध्ये मुख्य पिकासोबत अन्नद्रव्यांसाठी स्पर्धा करते. त्यामुळे पीक उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता असते. त्यासाठी गाजरगवत शेताबाहेर काढून टाकणे आवश्यक आहे. याच गाजर गवतापासून उत्तम दर्जाचे कंपोस्ट निर्मिती होऊ शकते. या खताचा वापर शेतामध्ये केल्यास जमिनीच्या सुपीकता वाढीस मदत होईल.

गाजर गवत हे प्रामुख्याने काँग्रेस गवत, पांढरीफुली, चटकचांदणी इत्यादी नावांनी ओळखले जाते. शास्त्रीय भाषेत याला 'पार्थेनियम हिस्टेरोफोरस' असे म्हटले जाते. हे गवत शेतजमीन, मानव, प्राणी, पर्यावरण आणि जैवविविधतेसाठी अत्यंत घातक आहे. दरवर्षी गाजर गवताच्या समूळ निर्मूलनासाठी '१६ ते २२ ऑगस्ट' या कालावधीत 'गाजर गवत जागरूकता सप्ताह' आयोजित केला जातो. हे बाहमाही गवत अतिशय वेगाने वाढते. शेताचे बांध, पडीक जमिनी, कुरणे, औद्योगिक वस्ती, रेल्वेमार्ग, रस्ते यांच्या बाजूने उगवलेले दिसून येते. मागील काही वर्षांमध्ये सर्व प्रकारच्या पिकांमध्ये तसेच फळबागांमध्ये हे गवत झपाट्याने वाढल्याचे दिसून येत आहे.

हे गवत शेतामध्ये मुख्य पिकासोबत अन्नद्रव्यांसाठी स्पर्धा करते. त्यामुळे पीक उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता असते. पीक उत्पादनामध्ये रासायनिक खतांच्या सातत्याने होणाऱ्या अतिवापरामुळे दिवसेंदिवस शेतजमिनीची सुपीकता कमी होत चालली आहे. त्यासाठी रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय खते, कंपोस्ट खतांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. गाजर गवतापासून चांगल्या दर्जाच्या कंपोस्ट खताची निर्मिती होऊ शकते. त्यामुळे दुहेरी फायदे होतात.



शेतातील गाजर गवताचे प्रमाण कमी होईल शिवाय खतनिर्मितीमधून जमिनीची सुपीकता वाढीस चालना मिळेल.

कंपोस्ट बनविण्याची पद्धत : नाडेप किंवा खड्डा पद्धतीद्वारे कंपोस्ट तयार करण्यासाठी फुलांवर येण्यापूर्वीची गाजरगवताची झाडे गोळा करण्याची शिफारस आहे. सुमारे १०० किलो हिरव्या गाजर गवतापासून ३७ ते ४५ किलो कंपोस्ट खतनिर्मिती होऊ शकते. कंपोस्ट निर्मितीसाठी पाणी साचणार नाही अशी जागा निवडावी. त्याजागी ३ फूट खोल, ६ फूट रुंद आणि १० फूट लांबीचा खड्डा तयार करावा. खड्ड्याचा आकार आवश्यकतेनुसार कमी जास्त करता येतो. परंतु खोली शिफारशीप्रमाणेच (३ फूट) ठेवावी. खड्डा भरण्यासाठी गाजरगवत १०० किलो, शेण १०० किलो, युरिया किंवा रॉक फॉस्फेट १० किलो, माती २०० किलो आणि पाणी इत्यादी साहित्य लागते. शेतातून किंवा परिसरातून फुलावर येण्यापूर्वीच्या अवस्थेतील गाजर गवताची झाडे गोळा करावीत.

ही झाडे तयार केलेल्या खड्ड्याच्या पृष्ठभागावर सुमारे १०० किलो प्रमाणे पसरावीत. त्यावर ५०० ग्रॅम युरिया किंवा ३ किलो रॉक फॉस्फेट शिंपडावे. असे थरांवर थर करावेत. सेंद्रिय पिकांमध्ये या खताचा वापर करायचा असल्यास युरियाचा वापर करणे टाळावे. त्याऐवजी ट्रायकोडर्मा व्हिरीडी किंवा ट्रायकोडर्मा हर्जियानम ५० किलो प्रति थर याप्रमाणे वापर करावा. पहिला थर टाकल्यानंतर जमिनीच्या पृष्ठभागापासून १ फूट उंचीपर्यंत खड्डा भरून घ्यावा. प्रत्येक थरामध्ये गाजर गवत, युरिया किंवा रॉक फॉस्फेट आणि शेणमाती यांचा एकसमान वापर करावा.

थर बनविताना प्रत्येक थरानंतर पायांनी दाब द्यावा. त्यामुळे गाजर गवत घट्ट होण्यास मदत होईल. थर एकमेकांवर दिल्यानंतर खड्डा घुमट आकारात भरून घ्यावा. वरीलप्रमाणे थरांवर थर देऊन खड्डा भरून घ्यावा. भरलेला खड्डा शेण, माती आणि पीक अवशेष किंवा भुस्सा यांच्या मिश्रणाने झाकून घ्यावा. साधारण ४ ते ५ महिन्यांनंतर चांगले विघटित कंपोस्ट खत तयार होते.

तयार कंपोस्टची चाळणी : खड्ड्यातून कंपोस्ट काढून घेतल्यानंतर, त्यात काही देठ दिसून येतील. त्यावरून गाजर गवत वनस्पती अद्याप विघटित झालेली नसल्याचे दिसून येईल. पण प्रत्यक्षात ती चांगले विघटित झालेले असेल. चाळल्यानंतर चाळणीत शिल्लक राहिलेले देठ काढून टाकावेत. हे कंपोस्ट सुकण्यासाठी सावलीच्या ठिकाणी पसरून ठेवावे. या कोरड्या कंपोस्टचा ढीग बनवून घ्यावा. तयार खताचा वापर विविध पिके, फळबागा आणि परस बागेमध्ये करता येतो. कंपोस्टमधील पोषक घटक : प्रकार-नत्र(टक्के)-स्फुरद (टक्के)-पालाश(टक्के)-कॅल्शिअम(टक्के)-मॅग्नेशिअम(टक्के)

गाजर गवत कंपोस्ट-१.०५-०.८४-१.११-०.९०-०.५५ गांडूळ खत-१.६१-०.६८-१.३१-०.६५-०.४३ शेणखत-०.४५-०.३०-०.५४-०.५९-०.२८

घ्यावयाची काळजी : गाजर गवतापासून कंपोस्टनिर्मिती करताना काही दक्षता बाळगणे आवश्यक आहे. खड्ड्याची जागा ही उघड्या ठिकाणी आणि सावलीत असावी. खड्डा भरून झाल्यानंतर तो माती आणि शेण मिश्रणाने झाकून ठेवावा. खड्डा केलेल्या ठिकाणी गाजर गवताची ताजी उगवण दिसून आल्यास त्वरित नष्ट करावी. अन्यथा, ते फुलावर आल्यानंतर संपूर्ण कंपोस्ट दूषित होण्याची शक्यता असते. कंपोस्टमधील ओलाव्याची पातळी वेळोवेळी तपासावी. खड्ड्यात कोरडेपणा असल्यास, छिद्र करून त्यातून पाणी घालून नंतर छिद्र बंद करावे. कंपोस्ट प्रक्रियेदरम्यान खड्ड्यातील तापमान ६० ते ७० अंश सेल्सिअसपर्यंत वाढते. त्यामुळे गाजर गवत वनस्पतीचे बियाणे नष्ट होण्यास मदत होते.

फायदे : चांगले कुजलेले गाजर गवत कंपोस्टचा पिकांवर, मानवासह जनावरे आणि पर्यावरणावर कोणतेही हानिकारक परिणाम होत नाही. गाजर गवतामध्ये असलेले पार्थेनियम हे विषारी रसायन कंपोस्ट निर्मिती दरम्यान पूर्णपणे विघटित होते. नत्र, स्फुरद आणि पालाशचे प्रमाण जास्त असते. पिकांस आवश्यक असलेली सूक्ष्म अन्नद्रव्येही उपलब्ध असतात. कमी किमतीत उपलब्ध निविष्ठांचा वापर करून दर्जेदार खत तयार होते. वापर (प्रति हेक्टर मात्रा) : भाजीपाला पिकांमध्ये हेक्टरी ४ ते ५ टन आणि इतर पिकांमध्ये पेरणीवेळी २.५ ते ३ टन प्रमाणे वापर करता येईल.

# वैद्यनाथ बँकेची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## डॉ. प्रितमताई मुंडे यांची उपस्थिती

परळी । प्रतिनिधी

दि.०८ सप्टेंबर २०२४ रोजी वैद्यनाथ बँकेची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मा.आ. पंकजा पालवे - मुंडे, माजी मंत्री तथा राष्ट्रीय सचिव भारतीय जनता पार्टी यांच्या मार्गदर्शनाने व डॉ. प्रितम मुंडे, माजी खासदार यांच्या विशेष उपस्थितीत विनोद सामत यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यनाथ प्रतिष्ठानच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सर्व प्रथम वैद्यनाथ प्रभू, माता सरस्वती, महालक्ष्मी, गणपती तसेच बँकेचे श्रध्दास्थान लोकनेते गोपिनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. सभेच्या सुरवातीस बँकेच्या संचालिका तथा बीड जिल्हयाच्या माजी खा. डॉ. प्रितम मुंडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तर मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व उपस्थित सर्व सभासदांचे शब्द सुमनाने स्वागत करण्यात आले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विनोद खर्चे यांनी सभेचे प्रास्ताविक केले. सुरूवातीस बँकेचे सभासद कै. शेषेराव कराड, डॉ. प्रकाश रामचंद्रराव डुबे, राजाभाऊ दहिवाळ, चेतन सेठीया, जयश्री दत्तात्रय इटके, शमशोद्दीन खतीब, सुभद्राबाई गुरुलिंगआप्पा तिळकरी, प्रकाशसिंग ठाकूर, उज्वला नंदकुमार रामदासी, उदयसिंग जयसिंगराव चव्हाण,



बालाजी ज्ञानोबा मुंडे, नाथराव बापुराव कराड, श्रीपाल दिपचंदजी गंगवाल, जगन्नाथ एकनाथ ढोकळे, संजय रामनिवास बजाज, काशिनाथ मन्मथआप्पा वाकळे, शशिकांत पुरुषोत्तम पंडीत, गिरीष बाबुराव कुलकर्णी, राजेशकुमार सुभाषचंद सकलेचा, खुशबिरसिंग बसंतसिंग बिंद्रा, दत्तात्रय कृष्णराव देशमुख, रामभाऊ मारुती निंबाळकर, शिवाजी मल्हारी कर्डिले तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्मे, भारतातील राजकीय, सामाजिक, सहकार, कला व साहित्य क्षेत्रातील व्यक्ती, बँक कर्मचारी, ज्ञात-अज्ञात सभासद, हितचिंतक, ठेवीदार, खातेदार पंचतत्वात विलीन झालेले आणि देशाचे रक्षण करताना शहीद झालेले वीर जवान यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यानंतर खर्चे यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसचे व मागील वार्षीक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले.

बँकेचे अध्यक्ष विनोद सामत यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून वैद्यनाथ बँकेच्या प्रगतीचा आढावा व वार्षिक सर्वसाधारण सभेचे विषय सभेत मांडले. सन २०२३-२४ चा आर्थिक वर्षाचा अहवाल मांडतांना मार्च २०२४ अखेर बँकेचे सभासद ४५,५३२ असून बँकेच्या ठेवी रू.७२९ कोटी १७ लाख व कर्ज रू.४२४ कोटी ०६ लाख आहेत. बँकेने केलेली गुंतवणूक रू. ३६१ कोटी २८ लाखाची आहे. बँकेने एकुण १०० कोटी ४४ लाख उत्पन्न मिळवलेले आहे. बँकेची आर्थिक स्थिती भक्कम करण्याच्या उद्देशाने बँकेने केलेल्या विविध तरतुदी वजा जाता बँकेला करपूर्व नफा ०१ कोटी ५३ लाख झाला आहे. बँकेला कर वजा जाता निव्वळ नफा रू.१०१ लाख झाला आहे. सन २०१४ ते सन २०१६ या काळात दुष्काळाचे संकट पाहता बँकेने कर्ज खात्यांचे रिशेड्युलिंग केले व व्याज रक्कमेची/ बीडीडीआर ची तरतुद करावी लागल्याने बँकेस मर्यादीत नफा झालेला आहे. पुढील आर्थिक वर्षापासून बँकेचा नफा वाढविण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशिल राहील असे सांगितले. तसेच बँकेचा सीआरएआरचे प्रमाण बँकेने १३.५९% वरून १८.४६% वर नेले आहे. तर बँकेच्या ठेवीवरील कॉस्ट ऑफ डिपॉझीट हे ६.२५% वरून ५.१९% इतके खाली आणलेले असुन यामुळे सभासदांसाठी व्यवसायीक कर्जाचा व्याजदर हा १४% वरून ११ % पर्यंत कमी करून डॉक्टर व औषध विक्रेते यांना सुध्दा ९% सुलभ व्याजदराने कर्ज देणे शक्य झाले आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार वसुली करून नेट एपीए प्रमाण ४.६९% राखले असून पुढील कालावधीत नेट एनपीएचे प्रमाण ०.०० % करण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न राहील असे सांगितले. यासाठी सर्व थकबाकीदारांनी थकबाकीची रक्कम भरणा करून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन केले. बँकेचे श्रध्दास्थान स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब, माजी चेअरमन स्व. मोमय्याजी व स्व. अशोकसेठ सामत यांचा बँकेच्या प्रगतीत सिंहांचा वाटा असुन त्यांच्या आशिर्वादानेच बँकेची प्रगती होत आहे. बँकेच्या प्रगतीत माजी चेअरमन तथा जेष्ठ संचालक श्री विकासराव डुबे यांचे मोलाचे योगदान व मार्गदर्शन लाभत असल्याचे सांगितले. आ. पंकजा पालवे-मुंडे, मा.खा.डॉ. प्रितम मुंडे, यांनी अहवाल वर्षात त्यांचा बहुमोल वेळ देऊन बँकेस वेळो वेळी मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार मानले व उपस्थित सर्व सभासदांनी सभेपुढील विषयास मान्यता दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करून आपले भाषण संपविले.

यानंतर डॉ. प्रितम मुंडे यांनी सभेस मार्गदर्शन करतांना सर्व सभासदांचे मनापासुन स्वागत करून बँकेची आर्थिक घडामोडीची आकडेवारी अध्यक्ष विनोद सामत यांनी आत्ताच सभे समोर मांडली असल्याचे सांगून यामध्ये बँकेच्या ठेवी, कर्ज, एन.पी.ए. वसुली या ठळक बाबी सभासदांसाठी महत्वाच्या ठरतात. संचालक मंडळ व कर्मचारी यांच्या प्रयत्नातुन मार्च २०२४ अखेर बँकेचे एन.पी.ए.प्रमाण ४.६९% पर्यंत राखून बँकेने आर्थिक स्थिती भक्कम केल्याबद्दल बँकेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाचे अभिनंदन केले. सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता शेतकऱ्यांना शेती कर्ज सुटसवलत अंतर्गत बेबाक करता यावे यासाठी बँकेने विशेष योजना लागू केलेली आहे. या योजनेचा थकीत कर्जदारांनी लाभ घ्यावा आणि सर्व सभासदांनी त्यांचे कर्ज खाते नियमीत ठेवण्याचे आवाहन केले. तसेच बँकेने अशीच उत्तरोत्तर प्रगती करावी, अशा शुभेच्छा देऊन आपले भाषण थांबविले. बँकेच्या या सभेसाठी बँकेचे सभासद, व्यापारी, वकील, डॉक्टर्स, इंजिनीअर्स तसेच बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हाईस चेअरमन रमेशराव कराड संचालक सर्वश्री नारायणराव सातपुते, प्रकाशराव जोशी, प्रविणजी देशपांडे, महेश्वरअप्पा निर्मळे, संदिपजी लाहोटी, प्रा. दासू वाघमारे, अनिलजी तांदळे तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खर्चे, सरव्यवस्थापक खंदाडे, बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासह मोठ्या संख्येने बँकेचे सन्माननीय सभासद तसेच पत्रकार बांधव उपस्थीत होते. शेवटी बँकेचे संचालक प्रा. दासू वाघमारे यांनी सर्व मान्यवर सभासदांचे आभार व्यक्त केल्यानंतर सभेची सांगता झाली.

# तहसीलदार विजय चव्हाण यांची विभागीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड



जालना । प्रतिनिधी

आज ८ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेची छत्रपती संभाजीनगर महसूल विभागाची बैठक पार पडली यावेळी राज्य कार्य अध्यक्ष सुरेश बगळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली सदर बैठकीमध्ये विभागीय अध्यक्ष किरण आंबेकर यांची पदोन्नतीने बदली नागपूर विभागात झाली असल्याने त्यांनी सदर पदाचा राजीनामा दिला असल्याने राज्य अध्यक्ष यांनी त्यांच्या विनंतीवरून त्यांचा राजीनामा मान्य करून आज दिनांक ८ सप्टेंबर २०२४ रोजी नांदेड येथे विभागीय कार्यकारणी निवडीकरिताची विशेष सभा अध्यक्ष या नात्याने आयोजित करण्यात आलेली होती.

सदर बैठकीमध्ये विविध विषयावर चर्चा होऊन मावळते विभागीय अध्यक्ष किरण आंबेकर यांचा राजीनामा मंजूर करून छत्रपती संभाजी नगर विभागाची नविन कार्यकारणी श्री संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारणी निवड समिती नेमून छत्रपती संभाजी नगर महसूल विभाग यांची कार्यकारणी निवड करण्यात आली सदर निवडी दरम्यान तत्कालीन विभागीय संघटक विजय चव्हाण यांची विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य तहसीलदार नायब तहसीलदार संघटना छत्रपती संभाजी नगर या पदावर बिनविरोध निवड करण्यात आली त्याचबरोबर श्री मुगाजी काकडे जिल्हा अध्यक्ष नांदेड यांची महाराष्ट्र राज्य तहसीलदार नायब तहसीलदार संघटना विभागीय सचिव या पदावर निवड करण्यात आली त्याचबरोबर श्री महेंद्र गिरगे यांची विभागीय संघटक म्हणून निवड करण्यात आली सदर वेळी विभागीय उपाध्यक्ष म्हणून नांदेड जिल्ह्याची भूमिपुत्र तथा तहसीलदार रेणापूर श्रीमती मंजुषा भगत यांची विभागीय उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली त्यासोबतच श्री किरण आंबेकर यांचे कार्य पाहता त्यांना विभाग स्तरावरती नेतृत्व देण्यात यावा याबद्दल सर्व सदस्यांचे एकमुखाने मागणी करण्यात आली त्या मागणीचा प्रमाणे राज्य कार्याध्यक्ष श्री सुरेश बगळे यांनी त्यांना मुख्य सल्लागार या पदावर नियुक्ती केली त्यासोबतच जीवराज डापकर निवासी उपजिल्हाधिकारी परभणी महेश वाडकर निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड यांची सुद्धा सल्लागार या पदावर नियुक्ती केली तत्कालीन विभाग सचिव श्री विद्याचरण कडवकर यांची मुख्य सल्लागार या पदी नियुक्ती करण्यात आली. सदर विशेष सभे अंतर्गत ऑनलाइन मीटिंग ही घेण्यात आली यावेळी निवडणूक आयोग यांची प्रशिक्षण असल्यामुळे अनेक सदस्यांनी ऑनलाईन मीटिंग अटेंड केली सदर बैठकीदरम्यान त्यांनीही सदर देऊन निवडी बाबत समाधान व्यक्त केले त्यासोबतच नायब तहसीलदार यांचा ग्रेड पे औरंगाबाद विभागातील विविध विषयाच्या अनुषंगाने असणारे प्रश्न हे सोडवण्याकरता नियुक्त कार्यकारणी यांना योग्य ते मार्गदर्शन श्री महेश वळतकर यांनी केले आहे

# शिक्षकांनी ज्ञान देत रहावे व विद्यार्थ्यांनी गृहण करत रहावे - नागरगोजे

पाटोदा । प्रतिनिधी

शिक्षकांनी सातत्याने ज्ञान देत रहावे व विद्यार्थ्यांनी ते औत्सुक्याने गृहण करत रहावे तेंव्हाच आयुष्यभर ज्ञानार्जनाची प्रक्रिया अविरत सुरु राहील. याच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आम्हाला घडवले व आमच्या जीवनाला दिशा दिली म्हणूनच आम्ही जीवनभर त्यांचे ऋणी राहू असे प्रतिपादन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी संजय नागरगोजे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी ( दि. ७) आयोजित माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे होते. व्यासपीठावर माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष राजेश गुगळे, ॲड.विजयकुमार




नागरगोजे, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, माजी विद्यार्थी व पालक समन्वय समिती समन्वयक प्रा. जगन्नाथ पटाईत, डॉ. हनुमान खेत्री उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम संस्थेच्या संस्थापिका कै. सौ. केशरबाई क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण अतिथींच्या हस्ते संपन्न झाले. यानंतर माजी विद्यार्थी व पालक अतुल शिंदे, ॲड. जब्बार पठाण, शिवाजीराव घरत, संजय नारायणकर, भागवत भोसले, ताहेरभाई, मारुती गिरी, दिलीप वाघमारे, प्रदीप मांजरे, बाबासाहेब नाईकनवरे, शत्रुघ्न गर्जे, मुख्तारखान पठाण यांचा माजी विद्यार्थी व पालक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अतुल शिंदे. ॲड. जब्बार पठाण व प्रा. प्रदीप मांजरे यांनी आपल्या मनोगतातून सद्यपरिस्थितीत वरिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीबद्दल खंत व्यक्त करत माजी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी अधिकाधिक विद्यार्थी नियमित उपस्थित राहण्यासाठी विविध प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे तसेच विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम राबवले जावेत असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्रो. सतिष माउलगे यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या विविध अभ्यासशाखांच्या विषयांची निवड करता येणार असल्याचे व अनेक व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्यात आल्याचे प्रतिपादन केले. प्रास्ताविक व अतिथी परिचय डॉ. हनुमान खेत्री यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी प्रा. महेश देशमुख, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रकाश फड, अंगद दराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. मेळाव्यास माजी विद्यार्थी, पालक व प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

# कर्ज फिटत नसल्यामुळे शेतकऱ्याची आत्महत्या

मंठा । प्रतिनिधी



सरकार कर्जमाफी लवकर करेल अशी आशा होती पण कर्जमाफी लवकर न झाल्यामुळे अंभोडा कदम येथील शेतकरी मोहन भीमराव चव्हाण वय ४३ वर्षे यांनी दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. यासंदर्भात मयताचे चुलत भाऊ संजय धोंडू चव्हाण यांनी खबर दिली की, त्यांचे शेत गट क्रमांक २१६ मधील लिंबाचे झाडाला स्वतःच्या अंगातील शर्ट काढून त्या शर्टाने मोहन भीमराव चव्हाण यांनी आत्महत्या केली आहे. घटनेची माहिती मिळताच मंठा पोलीस घटनास्थळी पोहोचले. मयत मोहन चव्हाण यांनी मुलीच्या लग्नासाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. कर्ज वेळेवर भरू न शकल्यामुळे आत्महत्या केल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या घटनेचा तपास तपासीक अंमलदार एस.जे. काळुसे हे करीत आहेत. याप्रकरणी सरकारनी लवकरात लवकर निर्णय घेऊन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी करावे नसता अशाच आत्महत्या शेतकऱ्याला करावा लागत्याल असे शेतकऱ्याकडून बोलल्या जात आहे.

# शेतकऱ्यांना नुकसानीची सरसकट मदत तात्काळ द्यावी - आ.कैलास गोरंटयाल

जालना । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे पिकं मोठया प्रमाणावर आडवी झाल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. पिकांच्या झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे नाकारता सरसकट शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी अशी मागणी आ.कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे विशेषतः सोयाबीन, कापूस या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जालना विधानसभा मतदार संघाचे आमदार कैलास गोरंटयाल यांनी आज दि. ७ सप्टेंबर शनिवार रोजी जालना तालुक्यातील मोतीगव्हाण येथे भेट देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष जात पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतात आजही गुडघाभर पाणी साचलेले असल्याने सोयाबीन आणि कापसाची पिके धोक्यात आली असल्याचे दिसून आले. या झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ



पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देण्यात यावी अशी मागणी आ. कैलास गोरंटयाल यांनी केली आहे. पिकांच्या नुकसानी शिवाय शेतकऱ्यांच्या जमिनीचेही मोठया प्रमाणात नुकसान झाले असून अनेक गोरगरिबांच्या घरांचीही पडझड झाली आहे. या नुकसानीचे देखील पंचनामे करून त्यांनाही आर्थिक भरपाई द्यावी अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांना पिकांच्या आणि जमिनीच्या झालेल्या नुकसानीचे तसेच घरांच्या पडझडी झालेल्या गरीब कुटुंबांना भरपाई मिळावी यासाठी आपण शासनस्तरावर देखील प्रयत्न करणार असल्याचे आ.गोरंटयाल यांनी स्पष्ट केले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसह घरांची पडझड झालेल्या कुटुंबांना भेट देऊन आ. कैलास गोरंटयाल यांनी त्यांच्याशी थेट संवाद साधत भरपाई मिळवून देण्याची ग्वाही दिली. यावेळी जालन्याच्या तहसिलदार छाया पवार, राम सावंत, राजेश पवार, सोपान तिरुखे, दत्ता पाटील घुले यांच्यासह गावातील फकीरबा मोहिते, दिलीपराव मोहिते, भगवानराव मोहिते आणि ग्रामस्थांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# गावच्या विकासाची दूरदृष्टी असणारा सरपंच: माणिकराव पौळ

ऐसें गाव होतां आदर्शपूर्ण
शहराहूनीहि नंदनवन
सर्वांचे करील आकर्षण
सुंदर जीवन तुकड्या म्हणे...

परळीः तालुक्यातील राजकीय दृष्ट्या अत्यंत जागृत असणारे गाव म्हणजे पौळ पिंपरी होय. मागील २० वर्षापासून उपसरपंच,सरपंच पदावर कार्यरत असणारे माणिकराव पौळ यांचा जन्म ९ सप्टेंबर १९७८ रोजी झाला. सुमारे पाच हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या पिंपरी गावातील युवा नेता असलेलं हे 'माणिकरत्न' हेरले ते 'रत्नपारखी' असणाऱ्या महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे आणि त्यांचे विश्वासू वाल्मीक अण्णा कराड यांनी. यांनी केलेल्या अमूल्य सहकार्यामुळे पौळ पिंपरी या गावात विविध विकास कामे करून सरपंच माणिकराव पौळ यांनी गावात विकासाची गंगा अक्षरशः खेचून आणली आहे.

विकासाची दूरदृष्टी असणं यालाही कुठेतरी वारसा असावा लागतो किंवा तसेच संस्कार असायला हवेत हेच संस्कार माणिकराव पौळ यांचे वडील रामभाऊ अण्णा पौळ यांच्याकडून त्यांना मिळाली आहे.तेही पिंपरी गावचे पंधरा वर्ष बिनविरोध उप सरपंच होते.राजकारणाचे बाळकडू अण्णा कडून घेत त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत. लोकांच्या हिताची जी कामे आहेत ती कामे मार्गी लावण्याचा सेवायज्ञ माणिकराव पौळ यांनी पुढे चालू ठेवला आहे. गोरगरिबांच्या मुलींच्या लग्नासाठी मदत, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक



मदत, जिल्हा परिषद शाळेसाठी सुरक्षा असावी म्हणून सीसीटीव्ही यंत्रणा, डिजिटल शाळा त्याचबरोबर गावातील उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बस सेवा सुरू करण्यासाठी कायमच त्यांची शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा केला.

एक आदर्श सरपंच कसा असावा याचे उत्तम उदाहरण माणिकरावांनी दाखवून दिले. जनतेचे कुठलेही काम असो ते नेहमीच तिथे हजर असतात. गावाला आदर्श बनवण्यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली आणि घेत आहेत. गावासाठी जे काही करता येईल ते त्यांनी करण्याचा प्रयत्न केला. आदर्श शाळा घडवण्यासाठी त्यांनी शाळेला आनंददायी शिक्षण देणारी शाळा बनवली. शाळेच्या संरक्षक भिंतीपासून ते सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यासाठी त्यांनी स्वतः खर्च केला. हे सर्व करीत असताना राज्याचे कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे आणि वाल्मीक अण्णा कराड यांचा निष्ठावंत सैनिक म्हणून त्यांनी नेहमीच काम केले. साहेबांचे आणि अण्णांचे पाठबळ घेऊन विकासाच्या सर्व संकल्पना पिंपरीत राबविण्यासाठी सरपंचांनी काम केले. पिंपरी गावचे सरपंच माणिकराव पौळ यांनी ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन गावच्या विकासासाठी काम केले आहे.

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. जर खेडी सुधारली तर तालुका सुधारेल. तालुका सुधारला तर जिल्हा सुधारेल. जिल्हा सुधारला तर राष्ट्र सुधारेल आणि राष्ट्र सुधारले तर देश सुधारेल. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या गावाच्या विकासासाठी दूरदृष्टी ठेवून काम केले पाहिजे शासनाच्या लोकहिताच्या योजना खेचून आणण्याची धमक माणिकराव पौळ यांच्या रूपाने समस्त पिंपरीकरांना दिसून आली आहे. एक आदर्श सरपंच म्हणून माणिकराव पौळ यांच्याकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन निर्माण झाला आहे. गावातील सर्व तरुण एक युवा आणि आदर्श व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहतात. विशेष म्हणजे गावातील प्रत्येक व्यक्ती हा आपला कुटुंबातील सदस्य आहे असं त्यांना वाटतं, म्हणून नेहमीच तर प्रत्येकाच्या अडचणीच्या काळात धाऊन जातात.

कोरोना महामारीच्या काळात गावातील प्रत्येकाची सरपंच या नात्याने त्यांनी काळजी घेतली. जनजागृती सोबतच वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या. आजही गावातील रुग्णाला मोफत प्रवासाची व्यवस्थ सरपंच स्वतःच्या पैशाने करतात. गावाला रस्ते, पाणी, वीज आणि सर्व मूलभूत सुविधा निर्माण करून दिल्याने मागील दहा वर्षांच्या काळात गावाचा विशेष कायापालट झालेला आहे. वृक्ष लागवड आणि संवर्धन केल्याने सर्वत्र हिरवे हिरवे वातावरण निर्माण झाले आहे. जलसंधारणाची अनेक कामे त्यांच्या कार्यकाळात झाल्याने पाण्याची कायमस्वरूपी समस्या दूर झाली आहे.साडे आठ कोटी रुपये खर्चाची जल जीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामामुळे कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला.

दोन मजली सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाले,.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहाचे बांधकाम, बुद्ध विहार, सर्व समाजाच्या अद्ययावत स्मशानभूमी, ५ रुपयांत शुद्ध आणि फिल्टर्ड पिण्याच्या पाण्याची सोय, हागणदारी मुक्त गाव, गावात प्रवेश केल्याबरोबर मन प्रसन्न करणारे मां साहेब जिजाऊ स्मारक, कायमस्वरूपी विजेची समस्या मार्गी लागावी यासाठी ३३ के.व्हीची मान्यता, मुस्लिम समाजासाठी स्मशानभूमी, वाडी वस्ती, तांडे येथे चकचकीत रस्ते आणि हायमस्ट विजेची सोय, घन कचरा व्यवस्थापन, अंगणवाड्याचे बांधकाम १२५ कुटुंबांना घरकुले आणि १५० निराधारांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी माणिकराव पौळ यांनी आजपर्यंत विशेष प्रयत्न केले आहेत. नवीन ग्रामपंचायत इमारत व्हावी यासाठी नुकताच ३० लक्ष रुपयांचे निधी मंजूर झाला असून लवकरच त्याही कामाचा शुभारंभ झाला असून त्याचे काम सुरू आहे. तसेच ना. धनंजय मुंडे साहेबांच्या माध्यमातून तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात गाव आले असून सध्या १कोटी रुपये निधी मंजूरझाला आहे त्याचीही कामे चालू आहेत. अशा या लोकप्रिय सरपंचाचा अभिष्ट चिंतन सोहळा आज गावातील युवक मित्र मंडळाच्या वतीने कृषीमंत्री ना. धनंजयजी मुंडे साहेबांच्या उपस्थितीत आज संपन्न होत आहे.

**- उद्धव गायकवाड**

# परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार –उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## प्रकल्पग्रस्तांना ५० %टक्के जागा नोकरीमध्ये मिळणार: पालकमंत्री धंनजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश

**बीड । प्रतिनिधी**

प्रकल्प ग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये योग्य जागा मिळाव्या यासाठी राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री धंनजय मुंडे यांनी केलल्या विनंतीला उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होकार दिला असून यापुढे मंजुर आकृतीबंधाच्या ५०% जागा प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये मिळणार, असल्याचे आजच्या बैठकीत निर्णय झाला.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ येथील थर्मल पावरच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत दूरदृश्य प्रणाली माध्यमातून बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. यावेळी परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न व मागण्या प्राधान्याने सोडवल्या जातील, असा शब्द उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिला आहे.

मुंबईतील सह्याद्री शासकीय विश्रामगृहातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक तथा पर्यावरण व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार चंद्रशेखर बावनकुळे हे यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यासह प्रकल्पग्रस्त प्रतिनिधी निळकंठ चाटे, श्रीकांत फड, राज गडदे, सुधीर फड, आत्माराम फड, मुजा भांगे, प्रविण




मुंडे, प्रमोद नागरगोजे उपस्थित होते. वीज निर्मिती प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात काही समस्या बाबत आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आली यावेळी श्री. मुंडे यांनी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्यासाठी विविध मागण्या केल्या. यामध्ये प्रशिक्षण सेवेमध्ये ३ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांना विनाअट सामावून घेण्यात यावे. कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यांच्या झालेल्या भरतीमध्ये महानिर्मितीचा एकही प्रकल्पग्रस्त घेतला गेलेला नाही, तरी त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन रिक्त जागेमध्ये प्राधान्य देऊन समावेश करावे, २०१० पासून बंद असलेले तंत्रज्ञ ४ हे पद सुरु करुन त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्यात यावे, ज्या प्रकल्पग्रस्तांचे वय ४५ वर्षे पूर्ण झाले आहे, त्यांना समान काम समान वेतन या कायद्यान्वये वेतन देण्यात यावे अशा मागण्या होत्या. यावर उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले, प्रकल्पग्रंस्तांच्यामुळे नवीन प्रकल्प उभारली जातात. त्यांचा विकासातील वाटा महत्वाचा आहे, त्यामुळे त्यांची सामजिक सुरक्षितता महत्वाची असून मंजुर आकृतीबंधाच्या ५०% पदे ही प्रकल्पग्रस्तांनासाठी असावीत असा निर्णय श्री फडणवीस यांनी बैठकीत घेतला. श्री बावनकुळे यांनी याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी अशा सुचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यासह परळी औष्णिक विद्युत केंद्रातील ९ व्या संचाबाबतही उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्यासोबत झालेल्या दूरदृश्य प्रणाली अंतर्गत झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.




**बीड विधानसभा मतदारसंघातील गवळवाडी येथील श्री. उमेश महादेव तोडेकर यांची मध्ये नियुक्ती झाली. आज भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय बीड येथे सत्कार करून शुभेच्छा दिल्या.**

# रामदास आठवले यांच्या उपस्थितीत रिपाइं शक्ती प्रदर्शन करणार:पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी

रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सामाजिक न्याय केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य शक्ती प्रदर्शन करण्यासाठी सोमवार (दि.९) सप्टेंबर रोजी रिपाइंच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड



जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

यापसंगी मार्गदर्शन करताना पप्पू कागदे म्हणाले की, राज्यासह देशपातळीवर रामदासजी आठवले शोषित, पीडितांच्या न्याय व हक्कासाठी संघर्ष करीत अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम दलित पँथर पासूनपासून आजपर्यंत रिपाइंच्या माध्यमातून करीत आहेत. उपेक्षितांना न्याय देण्यासाठी व विविध योजनांचा लाभ देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सतत संघर्ष करणारे रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांची तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने माननीय रामदासजी आठवले यांचा बीड शहरात येत्या ५ ऑक्टोबर रोजी आयोजित नागरी सत्काराचा माध्यमातून रिपाइंच्या वतीने भव्य शक्ती ◀◀ पान ३ वर

# स्नेहा पालीमकरने वर्ल्ड वेब रेकॉर्ड करुन बीडकरांची मान उंचावली –जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या बीड शहरातील गजानन महाराज संस्थान नगर रोडचे जोशी महाराजांची नात आणि सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांची कन्या स्नेहा पालीमकर यांनी१.४ सेमी तांदुळावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र रेखाटून वेब वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये सर्वात लहान कलाकृती म्हणून दि. ५ जुलै २०२४ मध्ये नाव नोंदवले असुन यांची दखल घेत जयदत्त आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला




आघाडी बीड विधानसभा प्रमुख तथा माजी सभापती नगरपरिषद बीड जयश्री विलास विधाते यांनी तिचा तिच्या आजोळी सत्कार केला. भविष्यात गिनीज बुक, लिम्का बुक, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नक्कीच तिची नोंद होईल असा विश्वास व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.

आपल्या वडीलांच्या पावलावर पाऊल ठेवत तिने हा विक्रम नोंदवला आहे. साधारणतः आठदहा वर्षापुर्वी सुहासजी यांनी सलग चोवीस तास व्यंगचित्र काढत त्यांनी आपले नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड, वेब वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदवले होते याची मी साक्षीदार असुन स्नेहा पालीमकरने वर्ल्ड वेब रेकॉर्ड करुन बीडकरांची मान उंचावली असे गौरवोद्गार काढले.

स्नेहा ◀◀ पान ३ वर

# मराठा आरक्षण जनजागृतीसाठी आष्टीत मोटरसायकल रथयात्रा

## पिंपळवंडी येथे शुक्रवारी होणाऱ्या घोंगडी बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील शिरी बू येथील मराठा युवकांनी आपले राजकीय पक्षाचे जोडे बाजूला ठेवून मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली समाजाने एकत्र येऊन मराठा आरक्षण मिळवण्यासाठी घोंगडी बैठका सुरू केल्या आहेत.१३ सप्टेंबर रोजी पिंपळवंडी येथे होणाऱ्या घोंगडी बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यासाठी मोटरसायकल रॅली काढण्यात आली.आष्टी तालुक्यातील शेरी बु.येथील दिपक सोनवणे,कांतीलाल गिऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली नामदेव सोनवणे, यादव सोनवणे,आजिनाथ सोनवणे,सचिन



सोनवणे,गणेश पवार,दिग्विजय महाडिक आदी सकल मराठा समाजाच्या वतीने आष्टी तालुक्यात मोटरसायकल रथयात्रा काढून मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावे यासाठी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे होणाऱ्या १३ तारखेला मराठा समाजाने आपला न्याय हक्कासाठी उपस्थित राहून मनोज जरांगे पाटील यांनी आयोजित केलेल्या घोंगडी बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील संपूर्ण मराठ्यांची एकजूट करून सरकारला सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणी जागे करण्यासाठी घोंगडी बैठकीचा निर्णय घेतला असून १३तारखेला ◀◀ पान ३ वर

# होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त भव्य राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील स्व.माजी खा.केशरकाकू क्षीरसागर यांनी १५ सप्टेंबर १९७४ साली स्थापित केलेल्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने बीड येथे नॅशनल होमिओपॅथिक सेमिनार तसेच बीड येथून उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा दि.१५ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमासाठी केंद्रातील आयुष मंत्री ना.प्रतापराव जाधव तसेच ना.टोकन साहू शहरी विकास राज्यमंत्री प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच यावेळी संस्थेचे सचिव



माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर अध्यक्षस्थानी राहणार आहेत तर राष्ट्रीय होमिओपॅथिक आयोगाचे चेअरमन डॉ.अनिल खुराना, राष्ट्रीय होमिओपॅथी संस्थांचे संचालक डॉ.सुभाष सिंग, रजिस्ट्रेशन बोर्डाचे प्रेसिडेंट डॉ.पिनांकिन त्रिवेदी राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे सचिव डॉ.संजय ◀◀ पान ३ वर

# माजलगाव मतदार संघात वाजणार तुतारी ;प्रा.ईश्वर मुंडे सगळ्यात भारी

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणूका दारावर येऊन ठेपल्या आहेत.तशी सर्व पक्षांची व संभाव्य उमेदवारांची लगबग वाढलेली दिसत आहे.सर्व पक्ष,संभाव्य उमेदवार व माध्यम समुह विविध उमेदवारांचा सर्वे करत आहेत.माजलगाव मतदार संघाचा एका खाजगी सर्वे एजंन्सी चा सर्वे समोर आला आहे.

या सर्वे मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार



पक्षाने महा विकास आघाडीत ओबीसी उमेदवार प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना आपली उमेदवारी दिली तर ते सर्वाधिक मतांनी निवडून येतील असा जनमताचा कौल आलेला आहे.त्यांना ३६.६१ टक्के मतदारांची पसंती आहे.

जर महायुती ने माधव निर्मळ यांना उमेदवारी दिली तर ते द्वितीय क्रमांकावर राहतील.त्यांना २१.१९ टक्के मतदारांची पसंती आहे.माजलगाव मतदार संघात मनोज जरांगे पाटील यांनी दिलेला उमेदवार तृतीय स्थानावर ◀◀ पान ३ वर



**बीड : नागापूर (खुर्द) येथे सावता गणेश मित्र मंडळाच्या गणपतीची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी दत्ता जगताप,राहुल साळुंके, अभिषेक भैय्या दिवे, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड सह सर्व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते..**

# शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला


## आष्टी तालुक्यातील नुकसानीचे पंचनामे कधी होणार

**आष्टी । प्रतिनिधी**

खरीप हंगामात अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. कष्टाने बहरलेल्या पिकांना अतिवृष्टीने आष्टी तालुक्यात भुईसपाट करून टाकले. यामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरले गेले आहे. याचे पंचनामे होत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. सतत सुरू असलेल्या पावसामुळे शेतात पाणी साचल्यामुळे आष्टी तालुक्यातील खरीप पिके कुजली आहेत.

तालुक्यातील खरीप हंगाम धोक्यात आला. त्यातच वातावरण सतत ढगाळ असल्यामुळे, सुर्य प्रकाश न मिळाल्याने पिकांची वाढही खुंटली आहे. सततच्या पावसामुळे तालुक्यातील दहा महसुल मंडळे व चार कृषी मंडळांमध्ये अवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात पाऊस झाला. यामुळे शेतात पाणीसाचले व हातातोंडाशी आलेला घास हिरावला.

नुकसानीत ◀◀ पान ३ वर



### कृषीमंत्र्यांचे आदेश असून पंचनामे नाहीत

सध्या जिल्हाभर पाऊस प्रमाणापेक्षा जास्त झाल्याने इतर तालुक्यांमध्ये सरसकट नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेशही कृषी मंत्र्यांनी दिले असले तरी आष्टी तालुका यामध्ये अपवाद ठरला आहे. येथील महसुल विभाग व कृषी विभाग पंचनामे करण्यास सरसावलेले दिसत नाहीत. आष्टी तालुक्यात पंचनामे करण्याचे आदेश नाहीत का? जर असतील तर येथील अधिकारी व कर्मचारी यांनी आजतगायत पंचनामे का केले नाहीत, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### महसूल विभाग गप्प का?

जिल्हाधिकारी यांनी सुद्धा आष्टी तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करण्याचे आदेश का दिले नाहीत ही मोठी अश्चर्यकारक बाब आहे. पावसामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला असताना महसुल विभाग गप्प का आहे? तालुक्यातील शेतकऱ्यांना वाली नाही का? असा सवाल आष्टी तालुक्यातील शेतकरी वर्गामध्ये मोठा चर्चेचा विषय ठरत आहे.

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी घेतायत संगणकाचे धडे

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

समग्र शिक्षा अंतर्गत राज्यातील २२७३ शाळेमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापित केल्या असून प्रत्येक शाळेवर या संगणक प्रयोग शाळेसाठी एक इन्स्ट्रक्टर सुद्धा रुजू करण्यात आलेले आहे, आधुनिक काळात टिकायचे असेल तर संगणकाशी मैत्री करावी लागेल व ते शिकावं पण लागेल हे उद्दिष्ट समोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई ,राज्य प्रकल्प संचालक श्रीमती आर विमला मॅडम यांनी आयसीटी (इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी)हा उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील १०१ शाळेमध्ये हा उपक्रम चालु असुन, अतिशय चांगल्या प्रकारचा उपक्रम राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई, श्रीमती. आर विमला मॅडम यांच्या सुचनेप्रमाणे व बीड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी श्री.भगवान फुलारी सर (प्रा.) यांच्या मार्गदर्शनाने राबविण्यात येत आहे, तर येणाऱ्या काळात या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होणार आहे.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजित पवार म्हणाले आमदार बदलला पाहिजे; आता युगेंद्र पवार उतरले बारामतीच्या मैदानात

पुणे । प्रतिनिधी

राज्यात सर्वच राजकीय पक्षांना आगामी विधानसभा निवडणुकांचे वेध लागले असून प्रत्येक पक्ष उमेदवारांची चाचपणी करत आहे. मात्र, उमेदवारांची घोषणा करण्यात मनसेनं आघाडी घेतली असून राज ठाकरेंनी मनसेच्या ७ उमेदवारांची आत्तापर्यंत नावे जाहीर केली आहेत. त्यानंतर, आज असदुद्दीन औवेसी यांनीही संभाजीनगर दौऱ्यात विधानसभेसाठी ५ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. दुसरीकडे महाविकास आघाडी व महायुतीमध्ये अद्यापही जागावाटपाची चर्चा आहे. मात्र, लोकसभेप्रमाणेच यंदाही बारामती



विधानसभेच मतदारसंघ चर्चेत असणार आहे. कारण, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामीत मतदारसंघात माझ्याऐवजी दुसरा आमदार मिळाला पाहिजे, असे म्हटले. त्यानंतर, आज लगेचच युगेंद्र पवार यांनी बारामती (इरीरारींळ) दौऱ्याची घोषणा केली आहे. स्वाभिमान यात्रेच्या माध्यमातून युगेंद्र पवार हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासाठी प्रचार करणार आहेत.

लोकसभा निवडणुकांवेळी पवार विरुद्ध सुळे असा राजकीय सामना रंगला होता. मात्र, तो सामना पवार विरुद्ध पवार असा काका विरुद्ध पुतण्या असाच होता. आता, बारामती विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा पवार विरुद्ध पवार अशीच निवडणूक होण्याची दाट शक्यता आहे. कारण युगेंद्र पवार उद्यापासून बारामती विधानसभा मतदारसंघात स्वाभिमान यात्रा काढत आहेत. यात्रेच्या निमित्ताने गावागावात युगेंद्र पवार जाऊन शरद पवार यांची भूमिका लोकांना समजून सांगणार आहेत. दरम्यान, अजित पवार यांनी बारामतीमध्ये विधानसभा निवडणुकांसंदर्भात केलेल्या वक्तव्यानंतर युगेंद्र पवार आता मैदानात उतरल्याचं दिसून येत आहे.

साधारण १० दिवसांचा हा दौरा असून मतदारसंघातील सर्वच गावांत गाठीभेटी देऊन लोकांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातून करणार आहे, असे युगेंद्र पवार यांनी म्हटले. यावेळी, अजित पवारांच्या वक्तव्याबाबत विचारले असता, त्यांनी उत्तर देणं टाळलं. सुशिक्षीत बेरोजगारीचा मोठा प्रश्न आहे, मागच्या २० ते २५ वर्षात लोकसंख्या आणि बेरोजगारी खूप वाढली आहे. या प्रश्नावर आपण मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहोत. तसेच, पाण्याचा प्रश्नही बारामती तालुक्यात महत्त्वाचा असल्याचं युगेंद्र पवार यांनी म्हटलं.

# उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतले पुण्यातील मानाच्या गणपती बाप्पांचे दर्शन

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील दृष्काळाची छाया नष्ट होऊन सुखसमृद्धी लाभावी, बळीराजा संतुष्ट होऊन राज्यातील सर्व प्रकारचे अरिष्ट टळावे. महाराष्ट्र राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी लोकाभिमुख व जनसामान्यांचे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा महायुतीचे सरकार यावे, अशी प्रार्थना उपसभापती, शिवसेना नेत्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी गणरायाकडे केली.



पुणे शहरातील मानाच्या गणपती बाप्पाचे दर्शन आज महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती, शिवसेना नेत्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी घेतले. यावेळी कसबा गणपती, श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग, मंडई गणपती, केसरी वाडा येथील गणरायाचे दर्शन घेऊन मनोभावे पुजा केली.

यावेळी सहसंपर्क प्रमुख दर्शना त्रिगुणाईत, सारिका पवार , मनिषा पारंडे जिल्हा प्रमुख, विभाग प्रमुख संजिवनी विजापूरकर विभाग प्रमुख, श्रृती राजरकर, जयश्री मोरे उपशहर प्रमुख तसेच शिवसेना भवन कार्यालय प्रमुख सुधीर जोशी उपस्थीत होते.

# आमदार सुनील कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनील कांबळे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दि. १० सप्टेंबर



रोजी कॅम्प परिसरातील नागरिकांसाठी मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यस्तरीय विशेष सहाय्यता कक्षाद्वारे हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

आमदार कांबळे यांच्याकडून मागील पाच वर्षात वेगवेगळया आरोग्य शिबिराद्वारे हजारो नागरिकांना मोफत उपचारांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच करोना संकटाच्या काळात नागरिकांना वैद्यकीय सेवेसह आमदार निधीतून कॅम्प भागातील शासकीय रूग्णालयांसाठी विशेष निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. सकाळी ९ ते दुपारी १ या कालावधीत हिंद तरूण मंडळ ट्रस्ट येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय जनता पार्टी कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष सुशांत निगडे व सर्व नगरसेवक पदाधिकारी,बालाजी ट्रेडर्स चे मल्हारी नरवडे,राज्यस्तरीय वैद्यकीय विशेष सहाय्यता कक्षाचे जिल्हा सदस्य सिद्धार्थ गिरमे,स्थानिक नगरसेवक दिलीप गिरमकर, बै.जे शासकीय महाविद्यालय, ससून सर्वोपचार रुग्णालय व धर्मादाय सहआयुक्त कार्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने हे शिबीर होणार असून या भागातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सुनील कांबळे मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# महापालिकेच्या रुग्णालयात वॉर्डबॉयकडून दोघींचा विनयभंग

पिंपरी – नातेवाईकांना घेऊन रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या मायलेकीचा वॉर्डबॉयने विनयभंग केला. ही घटना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील रुग्णालयात शनिवारी (दि. ७) रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली.



रोहन बाळासाहेब कांबळे (वय २४, रा. पंचशीलनगर, पिंपळे निलख) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत चिंचवड येथे राहणार्या ४२ वर्षीय महिलेने रविवारी (दि. ८) वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची नातेवाईक महिलेला एमआरआय करण्यासाठी थेरगाव येथील महापालिकेच्या रुग्णालयात शनिवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास आणले होते. त्यावेळी फिर्यादी महिला व त्यांच्या मुलीच्या अंगाला स्पर्श करीत आरोपी रोहन कांबळे याने विनयभंग केला. वाकड पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# मद्यधुंद चालकाने मनसे पदाधिकाऱ्याच्या पत्नीला चिरडलं, जागीच मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील पौडफाटा परिसरात रविवारी रात्री झालेल्या भीषण अपघातामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला आहे. ही महिला मनसे (चछड) पदाधिकाऱ्याची पत्नी असल्याची माहिती समोर आली आहे. पौडफाटा परिसरात झालेल्या अपघातात एका टेम्पो चालकाने श्रीकांत अमराळे आणि गीतांजली अमराळे या दाम्पत्याला चिरडले. हा टेम्पो चालक दारुच्या नशेत होता.



प्राथमिक माहितीनुसार, कोथरुड परिसरातील करिश्मा चौकात हा अपघात घडला. टेम्पो चालक आशिष पवार हा दारुच्या नशेत करिश्मा चौकातील गाड्यांना धडक देत जात होता. त्याचा टेम्पो करिश्मा चौकातील सिग्नलजवळ आला तेव्हा त्याठिकाणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी श्रीकांत अमराळे आणि त्यांची पत्नी गीतांजली अमराळे उभे होते. आशिष पवारने दारुच्या नशेत टेम्पो त्यांच्या अंगावर घातला. यामध्ये गीतांजली अमराळे यांच्या अंगावरुन टेम्पो गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर श्रीकांत अमराळे हे गंभीररित्या जखमी झाले आहेत. हा प्रकार तिथे उपस्थित असलेल्या गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पाहिला. त्यांनी आशिष पवारला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलीस याप्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

आशिष पवार या टेम्पो चालकाने करिश्मा चौकात अनेकांना उडवल्याची माहिती समोर आली आहे. या छोट्या टेम्पोने आधी करिश्मा चौकातील सिग्नलला दोन लहान मुलांना उडवले. मद्यपी टेम्पो चालक एवढ्यावरच थांबला नाही. त्याने टेम्पो तसाच पुढे नेला आणि काही गाड्यांच्या अंगावर वाहन नेले. त्यानंतर पौड फाटा येथे सावरकर उड्डाण पुलाजवळील सिग्नल तोडत दोन स्कुटींना धडक दिली. यानंतर टेम्पो चालकाने एका कारला धडक दिली.करिश्मा चौकापासून मद्यधुंद टेम्पो चालक आशिष पवार सात ते आठ जणांना उडवत आला. त्यानंतर टेम्पो चालकाने सावरकर उड्डाण पुलाखाली तीन जणांना उडवले. टेम्पो चालवताना देखील आशिष पवारचे डोळे मिटत होते. या घटनेनंतर जमावाने टेम्पो चालकाला खाली उतरवत मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात पुणे शहराच्या काही भागात मद्यविक्री बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी दिले होते. त्यानुसार मद्यविक्री बंदीची कडक अंमलबजावणी करण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील यांनी दिला होता.

# 'नीट असेल दृष्टी तरच पाहू सृष्टी' - शोभा धारीवाल

पुणे । प्रतिनिधी

आजकालच्या धावपळीच्या जीवनात स्मार्टफोन, कॉम्प्युटरचा अतिवापर, टीव्ही अधिक काळ पाहत राहणे, चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव, तणाव, जागरण यांमुळे डोळ्यांचे आरोग्य बिघडत चाललेले आहे. अनेकांना दूरचे दिसत नाही तर काहींना जवळचे दिसत नाही तर काहींना धूसरच दिसू लागते.




अनेक लोक डोळ्यांच्या आजाराकडे दुर्लक्ष करतात किंवा त्यांची काळजी घेत नाही तर काहींना डोळे सुद्धा आजारी पडतात याची जाणीव नसते, योग्य वेळी व वेळोवेळी डोळे तपासून घेणे तसेच डॉक्टरांनी निदानानंतर दिलेला चष्मा नेहमी डोळ्यावर ठेवणे आवश्यक आहे.

ध्यानात ठेवा कि नीट असेल दृष्टी तरच पाहू सृष्टी असे आवाहन आर एम डी फाऊंडेशन द्वारा ढोले पाटील वसाहत, गाडगे महाराज वसाहत, कोरेगाव पार्क व बर्निंग घाट बंड गार्डन येथे आयोजित मोफत डोळे तपासणी व चष्म्याचे वितरण शिबिराच्या समारोप प्रसंगी केले. या तिन्ही ठिकाणी मिळून १५०० पेक्षा अधिक स्त्री–पुरुष , वृद्ध तसेच लहान मुलांचे डोळे तपासण्यात आले तर १२५० लोकांनी मोफत चष्म्याचा लाभ घेतला. याप्रसंगी अध्यक्ष व कार्यकर्ते बंडगार्डन गणेश मित्र मंडळ, भीम शक्ति तरुण मंडळ, पंचशील फाऊंडेशन ताडीवाला इत्यादी व वसाहतीतील जनता मोठ्या प्रमाणात सहभागी झाली होती.

# छळाला कंटाळून महिलेने संपविले स्वत:चे जीवन

पुणे – पतीचे विवाहबाह्य संबंध आणि सततच्या छळाला कंटाळून एका महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना हडपसर भागातील भेकराईनगर परिसरात शनिवारी (ता. ७) घडली.

तेजश्री आकाश उदमले (वय २२, रा. शिक्षक कॉलनी, भेकराईनगर, फुरसुंगी) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत तेजश्रीची आजी देऊबाई पांडुरंग नेटके (वय ६५, रा. कोरेगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर) यांनी रविवारी (ता. ८) हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून आकाश अशोक उदमले (वय २५) याच्याविरूद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश आणि तेजश्री यांचा मार्च २०१९ मध्ये विवाह झाला होता. विवाहानंतर पतीचे अन्य एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याची माहिती तेजश्रीला मिळाली. याबाबत विचारणा केली असता, पतीकडून तिला शिवीगाळ आणि मारहाण केली जात होती. घरखर्चासाठी पैसे मागितल्यास पैसे न देता 'तू वांझोटी आहेस, तुला मूल होणार नाही,' असे टोमणे मारून तिचा छळ केला. या त्रासाला कंटाळून तेजश्रीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

# कोयत्याने वार झालेल्या २२ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

पुणे – चेष्टा मस्करीतून झालेल्या वादात एका तरुणावर रविवारी (दि.८) कोयत्याने वार करण्यात आले होते. गंभीर जखमी झाल्याने संबंधीत तरुणावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र सोमवारी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जयदीप ज्ञानेश्वर भोंडेकर (२२, रा. गुजर कॉम्प्लेक्स, मासे आळी, उत्तमनगर) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.



याप्रकरणी, उत्तमनगर पोलिसांनी अमित सुदाम गुजर (वय.२१,रा. मासे आळी उत्तमनगर) याला अटक केली आहे. त्याच्या विरुद्ध सुरुवातीला खूनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र आता त्यामध्ये खूनाचे कलमवाढ करण्यात आले आहे. याबाबत जयदीप याची आई लक्ष्मी ज्ञानेश्वर भोंडेकर (वय.४२,रा.मासे आळी उत्तमनगर) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना रविवारी (दि.८) दुपारी साडे बारा वाजताच्या सुमारास जुनी मासे आळी उत्तमनगर परिसरात घडली आहे. दरम्यान, जयदीप याच्या नातेवाईकांनी उत्तमगनर पोलिस ठाण्यात सोमवारी सायंकाळी गर्दी केली होती.

# मोटारीच्या धडकेने विद्यार्थ्याचा मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

भरधाव मोटारीने दुचाकीस धडक दिल्याने महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाला, तर अन्य एक जण जखमी झाला. नगर रस्त्यावरील लोणीकंद परिसरातील गाडे वस्तीजवळ शनिवारी (ता. ७) मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातानंतर मोटारचालक पसार झाला. सुधांशू राज (वय २२, रा. युनाईट पीजी हॉस्टेल, मॅजेस्टिक सिटी, वाघोली) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी वैभव रणधीर कुमार (वय २२, रा. युनाईट पीजी होस्टेल, वाघोली, मूळ रा. पटणा, बिहार) याने लोणीकंद पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून अज्ञात मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वैभव आणि सुधांशू वाघोलीतील एका महाविद्यालयात शिकतात. विमाननगरमध्ये चित्रपट बघून शनिवारी रात्री ते वाघोलीच्या दिशेने निघाले होते. वैभव दुचाकी चालवत होता, तर सुधांशू मागे बसला होता. योगिराज फर्निचरच्या दुकानासमोर 'यू टर्न' घेताना भरधाव मोटारीने त्यांच्या दुचाकीस धडक दिली. यात जखमी झालेल्या सुधांशूचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. वैभववर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# पोलिसांची फ्लॅटवर धाड, दरोडेखोरास अटक !

## इंदापुरात ९ सुतळी बॉम्ब, ३ पिस्टलस, तलावारी जप्त

पुणे : वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा अलर्ट झाल्या असून इंदापूरमध्ये एका सराईत गुन्हेगाराला अटक करण्यात आली आहे. दरोड्याची योजना आखणाऱ्या एका दरोडेखोरोला इंदापूर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. त्यावेळी, त्याच्याकडून मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर पोलिसांनी दरोडेखोराकडून ९ सुतळी बॉम्ब (इेल), ३ पिस्टलसह अन्य शस्त्र हस्तगत केले आहेत. सुयश ऊर्फ तात्या सोमनाथ असं आरोपीचं नांव आहे. याप्रकरणी आता वालचंदनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला असून आरोपीकडून अधिक चौकशी करण्यात येत आहे.



वालचंदनगर पोलिसांनी तब्बल नऊ बॉम्ब, तीन पिस्टल आणि तलवारी व कोयते घेऊन दरोडा टाकणाऱ्या सराईत गुन्हेगाराला वेळीच सापळा रचून त्याच्या मुसक्या आवळल्या. अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार यांनी याबाबत माहिती दिली. आरोपी सुयश ऊर्फ तात्या सोमनाथ घोडके याचा वालचंदनगर पोलीस शोध घेत होते. तो वालचंदनगर येथील अंजली बाल मंदीर क्रमांक ०१ येथील कामगार वसाहतीच्या पोस्ट कॉलनी डी–३ मधील खोली क्रमांक ०३ मध्ये त्याच्या मित्रांसोबत असल्याची बातमी पोलिसांना मिळाली. त्यानुसार वालचंदनगर पोलिसांच्या पथकाने संबंधित खोलीवर सापळा लावला, त्यानंतर योग्य वेळ साधत सदर आरोपीला ताब्यात खोलीवरुनच ताब्यात घेतले. आरोपीकडून पोलिसांनी ३ गावठी पिस्टल मॅग्झीन सहीत एक खाली मॅग्झीन, दहा जिवंत काडतुसे (राऊंड),चौदा वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल, दोन लोखंडी कटर, एक लोखंडी तलवार, दोन लोखंडी चाकू, एक मुठ नसलेले तलवारीचे पाते आणि ९ सुतळी बॉम्ब असा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. त्यामुळे, इंदापूर किंवा परिसरात मोठा गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या या गुन्हेगार टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

# एकतानगरच्या पुनर्वसनासाठी लागणार ६९८ कोटी; राज्य सरकारने केली घोषणा

पुणे – सिंहगड रस्त्यावरील एकतानगर मध्ये निळ्या रेषेच्या आतील बांधकामांचे पुनर्वसन करण्याची घोषणा राज्य सरकारने केली. त्यानंतर महापालिकेने या भागाचे सर्वेक्षण केले आहे. यामध्ये सुमारे १०३ इमारतींमधील १ हजार ३८३ सदनिका, ६७ दुकानांचे पुनर्वसन करण्यासाठी आराखडा तयार केला जाणार आहे. ठाणे येथे केलेल्या क्लस्टरच्या धर्तीवर एकनागरमध्ये पुनर्वसन केले जाणार आहे. यासाठी ६९८ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे, अशी माहिती महापालिकेतील सूत्रांनी दिली.



पुणे शहर व खडकवासला धरण प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे २५ जुलै मुठा नदीला पूर आला. त्यामध्ये एकतानगर भागातील अनेक सोसायट्या, दुकानांमध्ये पाणी घुसले. त्यामध्ये कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असून, या खर्चातून अद्याप नागरिक पूर्णपणे सावरलेले नाहीत. या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह राज्यातील अनेक नेत्यांनी या ठिकाणी भेटी दिल्या.

मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी ही बांधकाम आधी झाली आहेत, त्यानंतर निळी पूर रेषा निश्चित झाली आहे. त्यामुळे यामध्ये नागरिकांचा कोणताही दोष नाही. नागरिकांचे कायम स्वरूपी पुनर्वसनासाठी विशेष दर्जा देऊन क्लस्टर तयार केले जाईल अशी घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी केली होती. त्यानुसार महापालिकेने या परिसरात सर्वेक्षण केले. त्यामध्ये १०३ इमारती या निळ्या पूर रेषेसह निळ्या लाल पूर रेषेच्या आतमध्ये आहेत. त्यामध्ये एकूण १ हजार ३८३ सदनिका असून, ६७ दुकानांचा समावेश आहे. या इमारतीचे निवासी क्षेत्रफळ हे ८७ हजार ३९९ चौरस मीटर असून, व्यापारी क्षेत्र १ हजार ३४० चौरस मीटर इतके आहे. बांधकाम नियमावलीनुसार दाट लोकवस्ती नसलेल्या भागात दोन हेक्टरपेक्षा जास्त भूखंडावर क्लस्टर करता येऊ शकते.

# भाजपच्या प्रदेश कार्यकारणी सदस्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल

केडगाव : भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य आणि दौंडचे माजी तालुकाध्यक्ष तानाजी दिवेकर त्यांचे सहकारी सुनील खंडाळे आणि एका अज्ञातावर महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत बोरीपार्धी येथील एका महिलेने यवत पोलिस ठाण्यात रविवारी (दि.८) तक्रार दाखल केली.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, गर्भवती असलेली तक्रारदार महिला एप्रिल महिन्यात केडगाव येथील हॉस्पिटलमध्ये गेली होती. तेथून बाहेर जाताना या महिलेच्या पतीला तानाजी दिवेकर यांचा फोन आला. काही वेळातच दिवेकर हे सुनिल खंडागळे आणि आणखी एका व्यक्तीबरोबर इनोवा कारमधून तेथे पोहोचले. याच कारमधून दिवेकर आणि हे सर्वजण केडगाव पोलीस चौकीजवळ आले. त्यावेळी संबंधित महिलेच्या पतीने आपला जो काही विषय आहे. तो आपण गाडीत बसून बोलून असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व तिचा पती दिवेकर यांच्या गाडीत बसले. यादरम्यान शेजारी बसलेल्या दिवेकर यांनी तक्रारदार महिलेचा विनयभंग केला. तसेच याबाबत कोठे वाच्यता केल्यास हातपाय तोडण्याची धमकी दिल्याचे या महिलेने यवत पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याबाबतचा तपास सहायक पोलीस अधिकारी उत्तम कांबळे करत आहेत.